# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक २९.०६.२००५ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.०४) इतिवृत्त**

बुधवार दिनांक २९ जून २००५ रोजी स्थायी समितीची सभा मा.सभापती **श्री.काशिनाथ कोकाटे** यांचे अध्यक्षतेखाली '' मलिक अंबर स्थायी समिती सभागृह '' येथ दुपारी १२.०० वाजता ''वंदे मातरम्'' या गिताने सुरू झाली. या सभेस मा.आयुक्त व अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.

(०१) सौ. खंदारे वंदना प्रकाश
(०२) सौ. जधव संगिता विठ्ठलराव
(०३) सौ. दलाल लता श्रीनिवास
(०४) श्री. दाभाडे मिलींद यशवंत
(०५) श्री. पांडे विनायक प्रभाकर
(०६) श्री. बारवाल गजनन रामकिशन
(०७) श्री. बैनाडे कंवरसिंग किसनसिंग
(०८) श्री. विसपुते शशांक दामोधर
(०९) श्री. वैद्य रेणूकादास दत्तोपंत
(१०) श्री. जहागिरदार अजिजमुख्तार

**<u>संवाद :</u>**

श्री.रेणूकादास वैद्य : आजच्या विषयपत्रिकेसोबत इतिवृत्त दिलेले नाही. नगर सचिव विभागात पुरेसा कर्मचारी वर्ग देण्यात यावा. जेणे करून इतिवृत्त वेळेवर मिळू शकेल.

मा. सभापती : उप आयुक्त (प्रशासन) यांनी खुलासा करावा. कर्मचाऱ्यांचा अभाव, प्रशासनाने दखल घ्यावी.

उप आयुक्त (प्र) : साधारणत: २० जुलैच्या आसपास कोणत्या विभागात कर्मचारी कमी किंवा जस्त आहेत याचा आढावा घेण्यात येत आहे. ज्या विभागात खरोखरच कर्मचारी कमी असतील तेथे कर्मचारी देण्याचा प्रस्ताव प्रशासनाच्या विचाराधीन आहे. जुलै महिन्याच्या अखेरपर्यंत निश्चित देण्यात येईल.

सौ.लता दलाल : म.न.पा.त किती पदावर प्रभारी अधिकारी, कर्मचारी काम करीत आहेत? किती कनिष्ठ अभियंता, सब-ओव्हरसिअर पदे रिक्त आहेत? किती द्वितीय श्रेणीच्या अधिकाऱ्यांच्या जगा रिक्त आहेत. अनेकवेळा असे सांगण्यात येते की, अमुक रजेवर, अमुक व्यक्तीकडे अतिरिक्त चार्ज आहे. त्यामुळे शहरातील विकास कामावर थोडाफार परिणाम होत आहे. कोणत्या पदाच्या किती जगा रिक्त आहेत त्याची माहिती देण्यात यावी. किती तांत्रिक कर्मचारी नाहीत सर्व खुलासा करावा.

श्री.गजनन बारवाल : अत्यंत महत्वाची सूचना मांडलेली आहे. आपल्या देशात बेरोजगारीचा प्रश्न आहे. एकीकडे आपण सांगतो नोकर भरती करणार. परंतु लेखी परीक्षा झाली त्यासंबंधी वेगवेगळ्या बातम्या वृत्तपत्रात कशा आल्या. याकडे बारकाईने बघितले तर असे दिसून येईल की कुठेतरी गैरव्यवहार झालेला आहे. उमेदवारांच्या परिक्षा घेताना चुकीचे बैठक क्रमांक टाकल्या गेले. दुसऱ्या

जगेवर का बसविण्यात आले. ही परिक्षा कुणाच्या नियंत्रणाखाली घेण्यात आली. सविस्तर खुलासा करावा. शहरात निकृष्ट दर्जचे दूध येते त्यावर कार्यवाही होत नाही. तसेच शहरात आंब्यावर रासायनिक प्रक्रीया करून आंबा पिकविला जतो तोच बाजरात विक्रीला येतो. नागरीकांच्या आरोग्यास यापासून धोका होऊ शकतो.

श्री.रेणूकादास वैद्य : आताच खुलासा केला कर्मचाऱ्यांची पुनर्रचना करणार आहे. मनपाच्या ८३ शाळा आहेत. शिपायांची संख्या जवळपास ४८३ ते ५०० पर्यंत आहे. हे शिपाई प्रत्येक वर्गासाठी एक दिले का. ते इतरत्र कामासाठी वापरता येत नाही का? खुलासा करावा.

श्री.अजिजजहागिरदार : २०.६.२००५ च्या बैठकीत मी सुत गिरणी ते शहानुरमियाँ दर्गा या रस्त्याचे ७८ लक्ष रूपये खर्च करून काम करण्यात आले होते. दोन महिन्यात खड्डे पडले. प्रश्न उपस्थित केला होता. चौकशी चालू आहे, माहिती देण्यात येईल असे म्हटले होते. त्याची माहिती दिलेली नाही. संबंधीत ठेकेदारास काळ्या यादीत समावेश केला किंवा काय, त्यांना दंड आकारला का? ज्यांनी ७८ लक्षचे काम निकृष्ट दर्जचे केले त्याच ठेकेदारास पुन्हा विषय क्र.९ मधील ३० लक्षचे काम देणार काय? असे होत असेल तर योग्य नाही. प्रशासनाने याची नोंद घ्यावी.

मा. सभापती : एकाच विषयावर चर्चा केली तर प्रशासनास खुलासा करणे सोयीचे होईल. कर्मचाऱ्यांच्या बाबतीत प्रश्न उपस्थित झालेला आहे. प्रभारी पदभार बाबत उप आयुक्त (प्रशासन) यांनी खुलासा करावा.

श्री.विनायक पांडे : वर्ग-४ च्या कर्मचारी भरती करण्यासाठी लेखी परीक्षा घेण्यात आली. सदर प्रश्नपत्रिका कोणता निकष लावून तयार करण्यात आली व सदर परीक्षेच्या उत्तरपत्रिका कोणत्या तज्ञ व्यक्तींकडून तपासण्यात आल्या की मनपाच्याच अधिकाऱ्यांनी तपासणी केली व सदर उत्तर पत्रिका जमून ठेवलेल्या आहेत का? जर कुणास उत्तरपत्रिका बघायची असेल तर ते पाहू शकतात का? विद्यापीठात परीक्षा घेण्यात आल्या तेथे कुणाला जर उत्तर पत्रिका बघायची असेल तर ती बघता येत होती. इतकी पारदर्शकता ठेवलेली होती. याबाबत खुलासा करण्यात यावा.

श्री.गजनन बारवाल : लेखी परीक्षा घेण्यात आली त्या संदर्भात काही अधिकाऱ्यांना मेमो देण्यात आले का? ते देण्याचे कारण काय व आजची परिस्थिती काय यासंबंधी खुलासा करावा.

मा. सभापती : सविस्तर असा खुलासा उप आयुक्त यांनी करावा.

श्री.रेणुकादास वैद्य : कर्मचाऱ्यांची नियुक्ती करताना ज्या पदावर नियुक्ती केली आहे ते कर्मचारी त्याच पदावर काम करतात की इतर ठिकाणची जबाबदारी त्यांचेवर टाकलेली आहे.

उप आयुकत (प्र) : मनपामध्ये मुख्य लेखा परीक्षक, विधी सल्लागार, जनसंपर्क अधिकारी, मालमत्ता अधिकारी, ३ उप अभियंता, ६ विभागीय अधिकारी यापैकी दोन विभागीय अधिकारी हे प्रतिनियुक्तीने असल्यामुळे ४ विभागीय अधिकारी ७ कनिष्ठ अभियंता एवढया रिक्त पदांचा तपशील सध्या उपलब्ध आहे. लिपिक

व शिपाईच्या रिक्त पदाबाबत तपशील उपलब्ध नाही. सभा संपण्यापुर्वी उपलब्ध करून देता येईल. यापैकी विभागीय अधिकारी व उप अभियंता या पदावर पदोन्नती देण्याच्या संदर्भात येत्या मंगळवारी मा.आयुक्तांचे अध्यक्षतेखाली बैठक ठेवण्यात आलेली आहे. पदोन्नतीची पदे भरल्यानंतर रिक्त होणाऱ्या पदांबाबत तात्काळ प्रक्रीया सुरू करण्यात येईल.

श्री.गजनन बारवाल : जे लेखी परीक्षा घेण्यात आली त्याबाबतची माहिती देण्यात यावी.

मा. सभापती : नोकरी भराती बाबत व प्रभारी चार्ज बाबत माहिती दिलेली आहे. प्रभारी चार्जबाबत अनेक वेळा चर्चा होऊन सुध्दा ती पदे भरण्या संदर्भात प्रशासनाने कार्यवाही केलेली नाही. ठोस माहिती अशी की नोकर भरती करणार की, पदोन्नती देणार आहात व किती पदांची नोकर भरती करणार आहात हा खुलासा अपेक्षित आहे.

सौ.लता दलाल : मुख्य लेखा परीक्षक पद भरण्याबाबत वरीष्ठ स्तरावर काय कार्यवाही केली, विधी सल्लागार हे पद किती दिवसांपासून रिक्त आहे. पात्र कर्मचारी मिळत नाही का? ही सर्व पदे दोन्नती देऊन भरणार की आर.आर.नुसार भरणार आहात. नवीन दुरूस्त्या केल्या त्यानुसार भरणार यासंबंधी संपूर्ण खुलासा व्हावा.

मा. आयुक्त : मुख्य लेखा परीक्षक या पदावर आर.आर.नुसार प्रतिनियुक्तीवर अधिकारी असावा अशी तरतुद आहे. शासनाकडे पाठपुरावा चालू आहे, पत्र दिलेले आहे. या प्रकरणात स्मरणापत्र दिले. त्या पदावर शासनाकडून अधिकारी आल्यानंतर तसा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मान्यतेसाठी ठेवला जाईल व त्यांची नेमणूक होईल. दुसरे असे की, जीपदे रिक्त आहेत त्यावर पदोन्नतीने भरती केल्यानंतरच कनिष्ठ स्तरावरील पद रिक्त होईल. प्रत्येक मंगळवारी ही प्रकरणे बघत आहे. पुढील मंगळवारी बैठक आयोजित केली आहे. प्रभारी अधिकाऱ्यांसंदर्भात पदोन्नतीने पद भरल्यानंतर सभागृहाच्या मंजुरीसाठी पुन्हा येणारच आहे. आर.आर.मध्ये सर्व नमूद आहे. कोणती पदे पदोन्नतीने व कोणती डायरेक्ट भरती करता येतात. त्या टक्केवारीनुसार कार्यवाही होईल. आर.आर.मध्ये वेगवेगळ्या पदांचे वेगवेगळे नियम आहे. पदोन्नतीचे पद असेल तर पदोन्नतीने भरण्यात येईल. सरळ सेवेने असेल तर तसे भरती करता येईल. सेवा भरती नियम जे शासनाने मान्य केले नाही त्याप्रमाणे होणार नाही. विधी सल्लागार, जनसंपर्क अधिकारी ही पदे डायरेक्ट भरती करण्याचे नमूद आहे. त्याची कार्यवाही सुरू केली आहे. वरीष्ठ स्तरावरील पद भरल्यानंतर कनिष्ठ स्तरावरील पद आणखी रिक्त होतील. ती पदे डायरेक्ट किती व पदोन्नतीने किती भरायचे ते आर.आर.नुसार कार्यवाही होईल. पूर्ण पदे भरण्यास कमीत कमी १-२ महिने लागतील. प्रत्येक पदाची मंजुरीसाठी सभागृहासमोर येणार. तसेच लाड समितीच्या शिफारशी प्रमाणे अनुकंपा धर्तीवरची ४७ प्रकरणे आहेत. ८-१० दिवसात ती पण कार्यवाही होईल. त्यामुळे ही काही पदे रिक्त होतील.

सौ. लता दलाल : शिक्षण विीागात शिपाई किती, मुख्य कार्यालयात किती व किती जगा रिक्त आहेत याची माहिती द्यावी. तसेच झोन कार्यालयात किती?

मा. सभापती : मा. आयुक्त यांनी नोकर भरतीच्या संदर्भात खुलासा केला. मुख्य लेखा परीक्षक पदाच्या बाबत शासनाकडे पाठपुरावा होत आहे. पदोन्नती देत असतांना किंवा अनुकंपा तत्वावर भरती करतांना मनपातील कर्मचाऱ्यांवर अन्याय होणार नाही.

श्री.रेणुकादास वैद्य : ७ कनिष्ठ अभियंता कार्यरत आहेत असे म्हटले. ७ क.अभियंता यांना निलंबीत केलेले आहे. त्यांचा यात समावेश आहे का?

मा. सभापती : नोकरभरती करीत असतांना कुणावर अन्याय होणार नाही याची खबरदारी घ्यावी. प्रशासनास सूचना देण्यात येत आहे.

श्री.मिलिंद दाभाडे : एक वर्षापुर्वी चतुर्थश्रेणी कामगारांची भरती करण्यात आली त्यात २२ कर्मचाऱ्यांना वगळण्यात आले. १५-२० दिवस गैरहजर होते त्यांना वगळले. तत्कालीन स.सदस्य श्री.रतनकुमार पंडागळे यांनी सर्वसाधारण सभेत ठराव मांडला तो मंजूरही झाला होता. परंतु कार्यवाही झालेली नाही. त्या २२ कर्मचाऱ्यांना त्वरीत कायमस्वरूपी सेवेत सामावून घ्यावे.

मा. सभापती : दैनिक वेतनावरील २६८ कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्यासाठी शासनाकडे विविध विभागातील पदनिहाय प्रस्ताव पाठविलेला आहे. शासनाकडून मंजुरी आल्यानंतर कर्मचाऱ्यांना कायम करण्याच्या दृष्टीने निर्णय घेण्यात येईल.

श्री.गजनन बारवाल : शैक्षणिक वर्ष सुरु झालेले आहे. अनेक शाळांवर मुख्याध्यापक नाही. काही शाळांवर शिक्षक कमी आहेत. सातवीपर्यंत वर्ग आहेत पण शिक्षक नाही. या संदर्भात कार्यवाही करावयास पाहिजे १० कर्मचाऱ्यांना सेवेत कायम केले तरीसुध्दा कामावर घेतले नाही. तसेच लेखी परीक्षेचा खुलासा करावा.

सौ.लता दलाल : मनपा शिक्षक किती, किती शिक्षकांना आर्थिक गणना, (बी.पी.एल.) सर्व्हेची कामे दिलेली आहेत. जेव्हा जिल्हाधिकारी कार्यालयाकडून पत्र येते तेव्हा शिक्षक विना परवानगी निघून जतात. शिक्षणाधिकाऱ्यांना सुध्दा माहिती नसते. ५ दिवसाचे काम असेल तर १५दिवस येत नाहीत. कुणाची परवानगी घेऊन शिक्षक जतात. प्रत्येक शाळेत उत्तर मिळते १० शिक्षक आहेत परंतु ५ आर्थिक गणनेसाठी,५ सर्व्हेसाठी व इतर कामासाठी गेले. असे सर्व शिक्षक गेल्यानंतरशाळेत किती शिक्षक असतात. ७वी पर्यंत वर्ग असतात, एक-दोन तुकड्या असतात त्यासाठी१४ शिक्षकांची आवश्यकता असते. शिक्षकांना अशा कामासाठी पाठविल्याने शैक्षणिक दर्ज खालावतो. त्यामुळे विद्यार्थ्यांना पालक मनपा शाळेत पाठविण्यास तयार नसतात. खाजगी शाळांकडे जण्याचा कल वाढतो. परंतु जे आर्थिकदृष्ट्या कमकुवत घटकातील असतात व शिक्षण घेण्यास इच्छुक असतात अशा विद्यार्थ्यांनी कोठे जयचे असा प्रश्न येतो. किती शिक्षक बाहेरील कामासाठी गेलेले आहेत, त्यांनीपरवानगी घेतलेली आहे किंवा नाही. अशा शिक्षकांची नोंद प्रशासनाकडे असते किंवा नाही.

मा. सभापती : ८ दिवसांपुर्वीच शिक्षणाधिकाऱ्यांना विद्यार्थ्यांची संख्या, सर्व कर्मचाऱ्यांचेसंख्येबाबत माहिती विचारली होती व इतर कामासाठी बाहेर गेलेल्या शिक्षकांचे बाबत माहिती देण्यात यावी. शिक्षकांबद्दल मला माहिती नाही असे आपण उत्तर दिले होते का?

शिक्षणाधिकारी : ज्या वेळेस स.सदस्यांशी माझी चर्चा झाली तेव्हा असे समजले की, काही शिक्षक निवडणुकीच्या कामासाठी गेलेले आहेत. निवडणूक विभागाचे आदेश प्राप्त झाल्यानंतर संबंधीत शिक्षांना कार्यमुक्त करावे किंवा नाही याबाबत मुख्याध्यापक यांनी शिक्षणाधिकाऱ्यांची परवानगी घेतलेली नाही. मागील स्थायी समिती सभेमध्ये हा प्रश्न होता. नेमके किती शिक्षक बाहेरच्या कामासाठी गेलेले आहेत याची माहिती एक कर्मचारी नियुक्त करून घेत आहोत.

सौ. लता दलाल : शाळेतील शिक्षक जेव्हा इतर कामासाठी जतात तेव्हा शिक्षणाधिकारी यांना माहिती नसते. कालच विचारणा केली असता शिक्षणाधिकारी सांगतात मला कल्पना नाही. मुख्याध्यापकाकडे ती माहिती असते. शिक्षणाधिकारी हे प्रमुख असून सदर माहिती त्यांचेकडे नसेल तर जबाबादार कोण?

मा. सभापती : शिक्षणाधिकारी हे शिक्षण विभागाचे प्रमुख आहेत. ज्या शाळा चालतात या कुणाच्या नियंत्रणाखाली चालतात असा प्रश्न पडतो. स्वत:ची जबाबदारी काय खुलासा करावा. शिक्षणाधिकारी म्हणून आपली संपूर्ण ८१ शाळांची जबाबदारी आहे. म्हणून शासनाकडून प्रतिनियुक्तीने या पदावर अधिकारी येतात. जबाबदारी असताना खुलासा करता की, मुख्याध्यापक परस्पर शिक्षकांना पाठवतात. ही कामकाजची पध्दत होऊ शकत नाही. उप आयुक्त (प्र) यांनी खुलासा करावा.

उप आयुक्त (प्र) : शिक्षण विभागावर शिक्षणाधिकारी यांचे नियंत्रण आहे. हा विभाग उप आयुक्त (प्र) यांचे मार्गदर्शनाखाली काम करतो. मुख्याध्यापक व शिक्षक शाळेवर जतात की नाही, ते शाळेत काय काम करतात व निवडणुकीच्या कामासाठी शिक्षकांना जयचे असल्यास त्यांनी मुख्याध्यापकांना, मुख्याध्यापकांनी शिक्षणाधिकाऱ्यांना व शिक्षणाधिकारी यांनी उप आयुक्तांना माहिती देणे आवश्यक आहे. शिक्षकांकडे वेगवेगळी तीन कामे सोपविली आहेत. त्यात आर्थिक गणना, दारिद्रय रेषेचा सर्व्हे व काही शिक्षक निवडणुकीच्या कामासाठी वर्ग करण्यात आलेले आहेत. त्यातील आर्थिक गणनेचे काम अर्धवेळ अथवा एक किंवा दोन तासांचे आहे. प्रत्यक्ष आर्थिक गणनेचे काम हे स्वयंसेवी संस्थेकडे सोपविलेले आहे. प्रगणक काम करतात की नाही हे पाहण्याचे काम शिक्षकांकडे आहे. आर्थिक गणनेमुळे शाळेच्या वर्गावर किंवा शिक्षणावर परिणाम होतो असे म्हणणे योग्य नाही. दारिद्रय रेषेच्या सर्वेक्षणाचे काम २०० शिक्षकांकडे आहे. त्यामध्ये काही बालवाडी शिक्षक सुध्दा आहेत. ते काम सुध्दा पाहिजे तेवढ्या वेगाने सुरू झालेले नाही. त्या बाबतीत शासनाकडून फॉर्म्स उपलब्ध झालेले नाहीत. याचाही परिणाम शाळेवर होत नाही. जिल्हाधिकारी कार्यालयाकडे निवडणूक कामासाठी किती कर्मचारी असतील याची माहिती आजउपलब्ध नाही. ही वस्तुस्थिती आहे.

सौ. लता दलाल : याची मा.आयुक्तांनीदखल घ्यावी. शिक्षणाधिकारी यांचेकडे कर्मचाऱ्यांसंबंधी माहिती नाही. हवी असेल तर मी नावानिशी माहिती देऊ शकते. निवडणूक विभागात वर्षानुवर्षे कर्मचारी गेलेले आहेत. काम नसताना त्यांना कार्यमुक्त केले जते तरी ते शिक्षक मनपामध्ये काम करताना दिसून येत

नाही. याची सुध्दा गंभीर दखल घेण्यात यावी. यापुढे उडवाउडवीची उत्तरे देण्यात येऊ नयेत. शिक्षक कुठे जतात हे माहित नाही, पगार मात्र त्यांना वेळेवर होतो. असे असेल तर योग्य नाही. ही बैठक संपेपर्यंत याबद्दल माहिती देण्यात यावी.

मा. सभापती : शिक्षण विभाग चालविण्यासाठी मनपाच्या बजेटमध्ये कुठेही कमी केलेले नाही. जेविद्यार्थी शिक्षण घेतात ते दुर्बल व आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या घटकातील असतात. १ली ते ७वी पर्यंतचे जेविद्यार्थी आहेत ते देश घडविणारी भावी पिढी आहे. इतर विभागापेक्षा शिक्षण विभाग महत्वाचा आहे. या विभागाकडे दुर्लक्ष होत असेल तर चिंताजनक बाब आहे. मोफत गणवेश, पुस्तके, वह्या देण्यात येतात. कोणत्याही प्रकारची फिस घेतल्या जत नाही. चांगल्या इमारती असून फर्निचर उपलब्ध करून देतो. आवश्यक कर्मचारी उपलब्ध करून देतो व काम करताना समन्वय नसेल तर शिक्षणासारखे पवित्र काम सोडून शिक्षक इतर काम करीत असेल तर गंभीर दखल घेण्याची गरज आहे. जवळपास २४ हजर विद्यार्थी महापालिकेच्या शाळांतून शिक्षण घेतात. त्यांना व्यवस्थित शिक्षण दिले जत नसेल तर अत्यंत दुर्दैवी बाब आहे. याकडे मा. आयुक्त व उप आयुक्त (प्रशासन) यांनी लक्ष द्यावे. गतवर्षीच्या तुलनेत पटसंख्या कमी आहे. शिक्षकांना सर्व सुविधा, सवलती दिल्यावरही कुणी कामात हलगर्जीपणा करीत असेल व विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असेल तर यासंदर्भात काळजी घ्यावी. आठ दिवसांपुर्वी सर्व शाळेतील विद्यार्थी पटसंख्येबाबत माहिती मागविली होती परंतु ती अद्याप दिलेली नाही. पुढील बैठकीत देण्यात यावी. नोकर भरती बाबत उप आयुक्तांनी खुलासा करावा.

श्री.रेणुकादास वैद्य : मागील बैठकीत उस्मानपुरा शाळेच्या आवारातील एका वॉचमनच्या संदर्भात मुद्दा उपस्थित केलेला होता. मा.आयुक्त स्वत: तेथे भेट देणार होते. कृपया तीही माहिती देण्यात यावी.

श्री.विनायक पांडे : मनपाकडे किती क्रिडा शिक्षक आहेत. एक क्रिडा शिक्षण पाच ते सहा वर्षापासून जिल्हाधिकारी कार्यालयाकडे निवडणूकीच्या कामासाठी आहे. मला तेथेच थांबवून ठेवले असे तो सरळ सांगतो. पगार मात्र मनपामार्फत होतो. त्या शिक्षकाच्या मार्गदर्शनाखाली किती शाळा देण्यात आलेल्या होत्या व त्यांचा चार्ज सध्या कुणाकडे आहे. या क्रिडा शिक्षकांच्या माध्यमातून किती विद्यार्थी राज्यस्तरावर, राष्टीय स्तरावर खेळात चमकले आहेत याचाही आढावा घ्यावा. एक क्रिडा शिक्षक जलतरण तलाव विभागात कार्यरत आहे तेही शाळेत जत नाही. याचा संपूर्ण खुलासा पुढील बैठकीत घेण्यात यावा.

मा. सभापती : यापुर्वीच प्रशासनाला स्पष्ट आदेश केलेले आहेत. आगामी स्थायी समितीच्या बैठकीत शिक्षणाधिकारी यांनी संपूर्ण माहितीसह यावे. मा.आयुक्त यांना सुध्दा सूचना दिलेल्या आहेत. उस्मानपुरा शाळेतील वॉचमनच्या बाबतीत मा.आयुक्तांनी माहिती घेतलेली आहे. खुलासा करतील. परंतु शिक्षकांच्या बाबत तसेच क्रिडा शिक्षकांच्या बाबतीत शिक्षणाधिकारी यांनी संपूर्ण माहिती सभागृहासमोर ठेवावी. किती वर्षापासून शिक्षक निवडणूकीच्या कामासाठी आहेत, कुणाच्या परवानगीने गेलेले आहेत, त्यांचे पगार कोण अदा करते.

पुढील बैठकीत माहिती नाही असे बोलून चालणार नाही. नसता स्थायी समितीच्या माध्यमातून कार्यवाही प्रस्तावित होईल.

मा. आयुक्त : उस्मानपुरा येथील शाळेच्या आवारात जेवॉचमन राहतात त्या संदर्भात माहिती घेण्याच्या सूचना दिलेल्या होत्या. शिक्षणाधिकारी खुलासा करतील.

शिक्षणाधिकारी : येथील शाळेला भेट दिली असता तेथे वॉचमन आढळून आले नाही. तेथे चौकीदार राहतात म्हणून कोणीही तक्रार दिलेली नाही.

श्री.रेणुकादास वैद्य : मागील बैठकीत मी प्रश्न केलेला होता तेथे राहणारे वॉचमन हे मनपाचे कर्मचारी आहेत का? ती जगा त्या व्यक्तीस भाडेतत्वावर दिली का? मनपाचे कर्मचारी असेल तर अनेक वर्षापासून ते तेथे कशासाठी राहतात. त्यचांना तेथे राहण्याची परवानगी दिली का? असे प्रश्न होते. ज्याची पाहणी करण्यासाठी पाठवले होते तेच उत्तर द्यावे.

शिक्षणाधिकारी : काही शाळेवर चौकीदार राहतात.

मा. सभापती : काही शाळेवर राहतात असे मोघम उत्तर अपेक्षीत नाही. प्रत्येक शाळेत शिक्षक किती, वर्ग-४ चे कर्मचारी कुठे व कोणत्या शाळेवर काम करतात, विद्यार्थी संख्या किती याची संपूर्ण माहिती असणे आवश्यक आहे.

शिक्षणाधिकारी : पुढील बैठकीतसंपूर्ण माहिती देण्यात येईल.

श्री.गजनन बारवाल : मागील बैठकीत देखील हेच उत्तर दिले होते. सभा संपेपर्यंत माहिती देण्यात यावी.

मा. सभापती : पुढील बैठकीत सर्व माहिती ठेवावी नसता कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल.

श्री.कंवरसिंग बैनाडे : या शहरात किती जहिरात फलक आहेत व मनपास त्यापासून किती उत्पन्न मिळते. प्रत्येक झोनमध्ये किती फिनेल दिल्या जते. सध्याचे वातावरण पावसाळी आहे. जेथे कचरा कुंड्या आहेत तेथे बी.एच.सी. पावडर टाकण्यात येत होती ती आता बंद केल्याचे दिसून येते. ते का बंद केले, खुलासा करावा. पुरवठा होत असेल तर त्याचा वापर कोठे होतो खुलासा करावा.

मा. सभापती : तत्पुर्वी नोकर भरतीकरीता जी लेखी परीक्षा घेण्यात आली त्या संदर्भात खुलासा करावा.

उप आयुक्त (प्र) : मनपामध्ये लाईनमन विद्युत, लाईनमन पाणी पुरवठा, सुरक्षा रक्षक, इलेक्ट्रीक पंपचालक, माळी, शिपाई आदी एकूण १९ पदे भरण्यासाठी मनपाने दि.१३.६.२००३ रोजे जहिरात दिली. त्यानुसार १७०० अर्जप्राप्त झाले. त्याची छाननी करून १०६१ अर्जवैध होते. दरम्यानच्या काळात या भरती संदर्भात न्यायालयात दावे दाखल झाल्याने ही प्रक्रीया पुढे होऊ शकली नाही. न्यायालयाचे सर्व अडसर दूर झाल्यानंतर तत्कालीन आयुक्त यांचे मार्गदर्शनाखाली असा निर्णय घेण्यात आला की, दि.६.६.२००५ रोजे या १९ पदांसाठी लेखी परीक्षा घेण्यात यावी. ही परीक्षा मा.आयुक्त यांचे मार्गदर्शनाखाली घेणे अपेक्षित होते. परंतु या काळात मा.आयुक्त हे चंदीगड येथे अभ्यास दौऱ्यासाठी असल्यामुळे सदर परीक्षा उप आयुक्त (प्रशासन) यांचे मार्गदर्शनाखाली घेण्यात आली. जेपेपर सेट कऱ्णयात आले ते पोलीस आयुक्त कार्यालय, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय औरंगाबाद,

शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था औरंगाबाद, विक्रीकर विभाग, लेखा विभाग या विविध कार्यालयाचे अधिकारी यांचेकडून पेपर मागविण्यात आले होते. त्यातून छाननी करून प्रशासनाने वेगवेगळ्या ६ पदांसाठी ६ प्रश्नपत्रिका तयार केल्या होत्या. ह्या प्रश्नपत्रिका उप आयुक्त (प्र) यांचे दालनामध्ये संपूर्ण सुरक्षित, गोपनीयतेच्या दृष्टीने दि.५.६.२००५ रोजी तयार करण्यात आल्या. प्रश्नपत्रिका सिल करून जे अधिकारी, कर्मचारी नियुक्त केले होते त्यांचे ताब्यात दुसऱ्या दिवशी सकाळच्या सत्राचे पेपर सकाळी ९.०० वाजता आणि दुपारच्या सत्राचे पेपर दुपारी २.००वाजता ताब्यात देण्यात आले होते. प्रश्नपत्रिका ह्या बहुपर्यायी होतया. एकूण ४० प्रश्न होते, प्रत्येक प्रश्नाला २ गुण असा ८० मार्क्सचा पेपर होता. उत्तर लिहिताना अतिशय सुस्पष्ट अशा सूचना देण्यात आलेल्या होत्या. की जे उत्तर असेल त्यापुढे बरोबरची खुण करावी. गोल, क्रॉस व इतर कोणतीही खूण चालणार नाही. ही परीक्षा पार पडल्यानंतर पेपर तपासणीसाठी १४ अधिकारी/कर्मचारी नियुक्त केले होते. पेपरची तपासणी ही करमसिंग ओबेरॉय सभागृहात करण्यात आली. गोपनीयता राहावी म्हणून तपासणी करणारे अधिकाऱ्यांना मी स्वत: बोलावून २.०० वाजता पत्र दिले व ३.०० वाजता तपासणीचे काम सुरू झाले. पेपर तपासणीसाठी लाल रंगाचे पेन देण्यात आले होते. लाल रंगाच्या पेननेच हे पेपर तपासणे अपेक्षीत होते. अशाही सूचना देण्यात आल्या होत्या की, बरोबरची खुण सोडून इतर खुण असेल तर ते उत्तर चूक आहे असे गृहीत धरावे. ही प्रक्रीया कशा प्रकारे चालू आहे हे पाहण्याची परवानगी पत्रकारांना दिलेली होती त्यानुसार काही पत्रकार सुध्दा तेथे येऊन गेले. आताच स.सदस्यांनी मुद्दा उपस्थित केला की पेपर कोठे आहे? कोणास किती गुण मिळाले हे बघायचे असेल तर याबाबत खुलासा असा की हे पेपर अतिशय सुरक्षित ठिकाणी ठेवलेले आहेत. कोणत्याही उमेदवाराला त्याचा आक्षेप असल्यास त्यांना त्यांची उत्तरपत्रिका कार्यालयीन वेळात पाहता येईल. स.सदस्यांना बघायची असेल तर मा.आयुक्तांच्या निर्देशानुसार बघता येईल. दोन कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीसा बजवण्यात आलेल्या होत्या. २०८ क्रमांकावर न बसता २२८ या क्रमांकावर बसून परीक्षा दिल्यामुळे २२८ क्रमांकाचा विद्यार्थी हा अनुपस्थित होता. फक्त त्यंनी त्यांचे कामामध्ये हलगर्जे दाखविली त्यामुळे प्रशासनास ज्या अडचणी आल्या त्यास ते जबाबदार आहे म्हणून नोटीसा देण्यात आल्या. या परीक्षा प्रक्रीयेते कोठेही गैरप्रकार किंवा गडबड झालेली नाही असे स्पष्ट नमूद करतो.

श्री.गजनन बारवाल : खुलासा केला. वृत्तपत्रात आले. पत्रकारांना मुभा दिली हे सर्व ठिक आहे. परंतु कारणे दाखवा नोटीसा दिल्या त्याचे कारण जेहोते त्याचा खुलासा योग्य वाटत नाही. एक उमेदवार दुसऱ्या क्रमांकावर बसला यात दुर्लक्ष झालेले आहे. तसेच पेपर तपासणीसाठी जे परीक्षक होते त्यांना योग्य माहिती देण्यात आली नाही. नियमानुसार ही परीक्षा घेण्यात न आल्यामुळेही परीक्षा रद्द करावी अशी माझी मागणी आहे.

श्री.रेणुकादास वैद्य : एवढ्या पारदर्शीपणे परीक्षा पार पाडली असेल तर खरोखरच कौतुकास्पद बाब आहे. अभिनंदन करावे. ज्या तोंडी परीक्षा होतील त्या सुध्दा अशा प्रकारे पार पाडाव्या अशी विनंती आहे.

मा. सभापती : ज्या लेखी परीक्षा घेण्यात आल्या त्या त्या पदांना शासनाने मंजुरी दिली आहे. जी पदे रिक्त आहेत ती पदे भरण्याच्या दृष्टीकोनातून यापुर्वीही सभागृहाने चर्चा केलेली आहे. नोकरभरती झाली पाहिजे आवश्यक आहे. सर्व बाबींची पूर्तता करून घेतली पाहिजे स.सदस्यांनी जी सुचना केली त्यावरून सर्व स.सदस्यांचे याकडे लक्ष होते असे दिसते. कर्मचाऱ्यांची भरती करताना काही गैरप्रकार आढळले व इतरही काही त्रुटी असतील. शेवटी प्रशासनामार्फत नोकरभरती केली जते. नोकरभरती करताना महापालिकेचे नाव बदनाम होणार नाही याची काळजी घ्यावी. यापेक्षाही आणखी पारदर्शकता ठेवावी. स.सदस्यांनी लक्ष ठेवले त्यांचेही कौतुक, उप आयुक्त यांनी स्पष्ट व सविस्तर असा जे खुलासा केला त्यांचे कौतुक करण्यात येते. या खुलाशावर स.सदस्यांचे समाधान झाले असेल असे वाटते. उप आयुक्तांनी होर्डींग्जबाबत माहिती द्यावी.

उप आयुक्त (म) : होर्डींग दोन प्रकारे लावण्याची परवानगी आपण देतो. मनपाच्या हद्दीत असलेल्या जगेवर, रस्त्याच्या बाजुला, दुभाजकावर होर्डींग्ज लावण्याचे काम सेल ॲड कंपनीस देण्यात आले होते. त्याची मुदत १० जुलैच्या आसपाससंपत आहे. या कंपनीने २ वर्षात एकूण १३८३६ चौ.फुट एवढ्या लांबीचे विविध होर्डींग्जलावलेले आहेत. त्याची संख्या जवळपास ३ ते ४ हजर आहे. या कंपनीस ठेका दिला होता. सदर कंपनी न्यायालयात गेल्यामुळे येणारा महसूल आलेला नाही. वेगवेगळ्या जहीरात कंपन्या जसे अनील ॲडस्, गुरू ॲडस् यासारख्या कंपन्यांना देतो. अशा प्रकारे मनपा हद्दीत १७८ जहिरात फलकांना त्यांचे क्षेत्रफळ काही हजर चौ.फुट आहे. यामधून मनपास २००४-०५ मध्ये २७,४६,५८८/- चा महसूल प्राप्त झालेला आहे. येत्या आर्थिक वर्षात तो ३० लक्ष मिळेल. सेल ॲड कंपनीचा ठेका मुदत संपल्यानंतर नवीन कंपनीस दिल्यानंतर ही जवळपास २५ लक्ष रूपये महसूल अपेक्षीत आहे.

मा. सभापती : मुख्य लेखाधिकारी यांनी संपूर्ण माहिती द्यावी.

मुख्य लेखाधिकारी : सेल ॲड कंपनीला २ वर्षापुर्वी ३८ लक्ष मध्ये जहीरात फलक लावण्या संदर्भात ठेका दिला होता. त्यात मुंबई व नागपूर येथील २ एजन्सीज मिळून अशा एकूण तीन एजन्सीला ४४ लक्षचा ठेका दिलेला होता. दोन एजन्सीला करारनामे केलेले नव्हते. ३८ लक्ष पैकी फक्त १९ लक्ष रूपये सेल ॲड या कंपनीकडून भरणा करण्यात आले. उर्वरीत १९ लक्ष हे जेव्हा ६ महिन्याची मुदत देण्यात आली होती, करारनाम्यानुसार दोन टप्प्यात त्यांना भरणा करायचे होते. परंतु मुदतीत त्यांनी पैसे न भरता त्यांना ज्या विविध अडचणी आल्या होत्या त्या वेळोवेळी प्रशासनाकडे त्यांनी तक्रारी केल्या. त्यामुळे नंतर हे प्रकरण वादात गेले. कोणताही भरता त्यानंतर मनपाकडे केलेला नाही. मुळ मागणी अशी होती की, खाजगी इमारतीवर जहीरात फलक लावण्याची परवानगी मनपाने देऊ नये. ज्या जगा निश्चित करून दिल्या त्या जगेवर

बऱ्याच ठिकाणी अतिक्रमीत होर्डींग्ज आहेत त्या जगा रिक्त करून द्याव्या. सद्य:स्थितीत फक्त १९ लक्ष रूपयेच भरणा केलेले आहेत.

श्री.कंवरसिंग बैनाडे : जेव्हा ठेका दिला जतो तेव्हा करारनामा होतो. अनामत रक्कम घेतो का? घेत असेल तर ती रक्कम परत केली का? १९ लक्ष रूपये भरणा केले त्यापेक्षा जस्त उत्पन्न त्यांनी मिळविले. करारनामा असताना न्यायालयात कसे गेले?

श्री.अजिजजहागिरदार : संबंधीत एजन्सीने कोणत्या न्यायालयात दावा केला, एक वर्षात प्रकरणाची सुनावणी झाली नाही का? कोर्टकेसची सद्य:स्थिती काय आहे याची माहिती देण्यात यावी.

श्री.गजनन बारवाल : जी माहिती आली ती फक्त एका एजन्सीबाबत असून शहरात मोठ्या प्रमाणात जहिराती लावणे चालू आहे. त्यावर कोठेही वसूली केली नाही असे वाटते.

मुख्य लेखाधिकारी : सदरील विषय हा मालमत्ता विभागाशी निगडीत आहे. परंतु या एजन्सीने जिल्हा न्यायालयात प्रकरण दाखल केले. माझ्या माहितीप्रमाणे मा.न्यायालयाने 'जैसे थे' आदेश दिलेले आहेत.

मा. सभापती : सदर एजन्सीबरोबर करारनामा झाला असे असतांना सदर कंपनीने मनपाकडे पैसे भरणा केलेले नाही. न्यायालयात प्रकरण गेले. जे विभागप्रमुख असतील त्यांना अशी सूचना आहे की, होर्डींग्ज बाबत या सभागृहात अनेकवेळा चर्चा झाली. संबंधीत एजन्सीने पैसे जमा करून घेतले. असे असताना सदर कंपनी न्यायालयात जते कशी? करारनामा केला त्यात ज्या अटी शर्ती दिल्या त्यात बदल असेल तर संबंधीत अधिकाऱ्यांवर कार्यवाही करता येईल. जगा मनपाची, परवानगी मनपाने दिली. संबंधीत एजन्सी त्याचाच फायदा करून घेत असेल तर योग्य नाही. एखादी टपरी बसली तर ती उचलून आणल्या जते. सदर एजन्सीने दीड वर्षापासून होर्डींग्ज लावले, पैसे वसूल करतात. परंतु मनपास पैसे मिळकत नाही. यात निश्‍चितपणे कुणाचेतरी लागेबांधे असावेत. याबाबत मा.आयुक्तांनी दखल घ्यावी. मनपाच्या उत्पन्नात कोणी बाधा आणत असेल तर हे मान्य नाही व त्याची या सभागृहात गय केली जणार नाही. प्रशासनाने खबरदारी घ्यावी.

मा. आयुक्त : १० जुलैला करारनामा संपुष्टात येत आहे. त्यानंतर दुसऱ्या एजन्सीला ठेका देता येईल. कायद्याचे अडचण येणार नाही.

मुख्य लेखाधिकारी : मालमत्ता विभागाकडून तशी संचिका या संदर्भात आलेली नाही.

मा. आयुक्त : त्या एजन्सीचे म्हणणे असे होते की, ज्या जगा निश्‍चित करून दिल्या त्या जगेवर अनधिकृतपणे होर्डींग लावलेल्या होतया. १० जुलैनंतरसदर एजन्सीचा ठेका संपेल. परंतु ज्या जगेवर अनधिकृत होर्डींग आहेत त्या काढणे आवश्यक आहे व जेव्हापासून आहे तेव्हापासूनची वसूली करणे आवश्यक आहे. यासाठी मनपाच्या कर्मचाऱ्यांकडून खाजगी जगेवर किती होर्डींग आहेत याचा सर्व्हे करावा लागेल. टेंडरनुसार ज्या होर्डींग होत्या त्या मनपाच्या जगेवर अनधिकृत होत्या असे त्या एजन्सीचे म्हणणे होते. सर्व्हे केल्यानंतर किमान १०-१५% वाढ होऊ शकते. न्यायालयातील प्रकरण निकाली काढावे तसेच न्यायालयात असेही नमूद करावे की ज्या दिवसापासून त्या एजन्सीने पैसे भरणा केले नाही तेव्हापासून १८% दराने व्याजआकारावे व ते मनपास मिळावयास पाहिजे

मुख्य लेखाधिकारी : करारनामा केला त्यात नियम व अटी दिलेल्याच आहेत. मुळात स.सदस्यांचा मुद्दा आहे न्यायालयाने जैसे थेचा आदेश करून जहीरात फलक लावले आहेत. अॅड चेंज करून दुसऱ्याला सेल करतो आहे. त्याबद्दल काही तरी कार्यवाही होणे अपेक्षीत होते, ती झालेली नाही.

श्री.अजिजजहागिरदार : जैसे थे आदेश फक्त तीन महिन्यासाठी असतात. त्यानंतर अपील वगैरे करून स्थगिती आदेश का उठविण्यात आले नाही याबद्दल चौकशी व्हावी.

मा. सभापती : कोणत्या तारखेला सदर एजन्सी कोर्टात गेली व मनपातर्फे कोणती बाजू मांडलेली होती. किती दिवस प्रकरण न्यायालयासमोर आलेले नाही. विधी सल्लागार यांनी खुलासा करावा.

विधी सल्लागार : सेल अॅड कंपनी बरोबर जे करारनामा केला तो खाजगी जगेवर व रस्त्याच्या कडेला होर्डींग लावण्याबाबत आहे. करारनामा करीत असताना जी अट होती की यात काही डिस्प्युट झालेले असेल तर कंपनीला मध्यस्थामार्फत वाद सोडविण्याचा हक्क असेल. सेल अॅड कंपनी जहिरात फलक लावण्यास तयार आहे परंतु ज्या जगा मनपाने निश्चित करून दिल्या आहेत त्या जगेवर इतर एजन्सीने बोर्ड लावत आहे. त्यामुळे तेथे जहीरात फलक लावता येत नाही. म्हणून उर्वरीत पैसे भरण्यास तयार नाही असे म्हटले व पैसे न भरल्यामुळे मनपामार्फत वारंवार नोटीसा दिल्या. प्रतिसाद मिळत नसल्याने करारनामा रद्द केलेला आहे व त्या एजन्सीसोबत पुन्हा करारनामा करता येणार नाही. करारनामा रद्द केल्यानंतर न्यायालयाने स्थगिती आदेश दिला आहे आणि त्या एजन्सीने अनधिकृतरित्या पुन्हा काही जहीरात फलक लावलेले आहे. ते केव्हाही काढता येतील. याबाबत मी सुध्दा अभिप्राय दिलेले आहेत. कोणती कायदेशीर अडचण येणार नाही. सदर प्रकरणाच्या अंतिम निर्णयासाठी दि.१२/७/२००५ रोजी प्रकरण ठेवण्यात आलेले आहे व जैसे थे आदेशानंतर जेजहीरात फलक लावण्यात आले ते काढण्यास कोणतीही अडचण नाही.

मा. सभापती : सदर कंपनीने केव्हा कोर्टात दावा दाखल केला.

विधी सल्लागार : सदर एजन्सीने डिसेंबर मध्ये न्यायालयात दावा दाखल केला होता. कलम ९ नुसार तात्काळ मनाई हुकूमाची मागणी केलेली होती. या कलमामध्ये असे नमूद आहे की, एखादा वाद असेल तर तात्काळ मनाई हुकूमासाठी जिल्हा न्यायालयाकडे अर्ज करता येईल, अशी तरतुद आहे. त्यानुसार सेल अॅड कंपनीने न्यायालयात दावा दाखल केला होता. जैसे थे चे आदेश असून दि.१२/७/२००५ रोजी अंतिम सुनावणी आहे.

मा. सभापती : स्थगिती आदेश न मिळण्यासाठी मनपाने काय प्रयत्न केले. कोणते मुद्दे मांडण्यात आले होते.

विधी सल्लागार : कॅव्हेट दाखल करण्यात आले होते व जेपर्यंत मनपाचे म्हणणे ऐकून घेत नाही तोपर्यंत अंतरीम आदेश देऊ नये.

श्री.रेणुकादास वैद्य : कोणत्या तारखेला संबंधीत एजन्सीने अनधिकृतपणे होर्डींग झाल्याचे पत्र दिले होते, कोणत्या तारखेस करारनामा झाला व दरम्यानच्या काळात प्रशासनाने काय कार्यवाही केलेली आहे. निश्चित कोणत्या तारखेस ती एजन्सी न्यायालयात गेलेली होती.

मा. सभापती : तारीख वाईजखुलासा करावा.

विधी सल्लागार : करारनामा वगैरे ही कार्यवाही मालमत्ता विभागामार्फत झालेली आहे. न्यायालयीन जेवढी माहिती होती ती सादर केलेली आहे.

सौ. लता दलाल : करारनामा केव्हा झाला वगैरे याबाबत संचिका मालमत्ता विभागाकडे असेल तरी सुध्दा जेव्हा न्यायप्रविष्ट प्रकरण होते तेव्हा अधिकारी विधी सल्लागार यांचेशी चर्चा करतात. विधी सल्लागार यांचेकडे पूर्ण टिप्पणी दिलेली असते. त्या टिप्पणीमध्ये नमूद असेल, केव्हा त्यांचे जगेवर प्रशासनाने होर्डींग लावण्याची परवानगी दिली, केव्हा अतिक्रमण काढले, त्यानंतर केव्हा त्या एजन्सीने उर्वरीत भाडे भरणा केले, केव्हा नोटीस दिली. सदर कंपनी न्यायालयात गेल्यानंतर केव्हा प्रशासनाने दखल घेतली याबाबत संपूर्ण माहिती विधी विभागाकडे असावयास हवी.

श्री.अजिजजहागिरदार : कॅव्हेट दाखल केले असताना जैसे थे आदेश दिले.त्यानंतर लगेच मनपा मार्फत हजर राहून म्हणणे मांडले का?

श्री.विनायक पांडे : कॅव्हेट दाखल केल्यानंतर प्रशासनाचे म्हणणे ऐकून घेतल्याशिवाय कोणतेही न्यायालय जैसे थे आदेश देत नाही. ही कार्यवाही होत असताना मनपाच्या बाजूने कोणत्या वकीलानी म्हणणे मांडले त्याचे नांव सुध्दा समोर यावे. सदर बाजू मांडताना ते वकील प्रशासनाची बाजू मांडतात की संबंधीत व्यक्तीच्या बाजूने मुद्दे मांडतात हे सर्व समोर येणे आवश्यक आहे.

मा. सभापती : सेल ॲड व इतरही काही कंपनीच्या होर्डींगच्या संदर्भात अनेकवेळा सभागृहात चर्चा होऊन देखील योग्य निर्णय होऊ शकला नाही. उत्पन्नामध्ये घटच होत आहे. स.सदस्यांच्या भावना रास्त आहेत. या संबंधीची संचिका मा.आयुक्त यांनी मागवून त्यातील करारनामा व अटी शर्ती ची तपासणी करून मनपाच्या हिताच्या दृष्टीने निर्णय घ्यावा. आगामी स्थायी समिती सभेमध्ये संपूर्ण माहिती सादर करावी.

श्री.रेणुकादास वैद्य : जकात या विषयावर उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने चर्चा करीत असताना मा.आयुक्तांनी सुध्दा नोंद घ्यावी की जकात पावती क्र.९१९०१ ते ९२००० त्याचप्रमाणे १२९९० ते १३००० या क्रमांकाचे जे पावती पुस्तक आहे ते मागवून घेऊन मा.आयुक्तांनी चौकशी केली तर असे निदर्शनास येईल की ही पावती पुस्तके जकात नाक्यावर न फाडता कुठेतरी ॲन्टी चेंबरमध्ये बसून फाडण्यात आलेली आहे. त्यावर जकात निरीक्षकाची सही नाही. अशा प्रकारचे अनेक पावती पुस्तके असतील. त्याचा अभ्यास करून जकात चोरीला आळा घालावा. या संदर्भात जकात अधिक्षक यांचेकडून खुलासा सुध्दा घेण्यात यावा.

मा. सभापती : आताच स.सदस्यांनी जे सूचना केली त्या संदर्भात मा.आयुक्तांनी स्वत: ती पावती पुस्तके मागवून घ्यावी व योग्य ती कार्यवाही करावी.

उप आयुक्त (म) : आताच ज्या पावती पुस्तकाचा उल्लेख झाला ती दोन्ही पुस्तके मी ताब्यात घेतलेली आहेत. या संदर्भात जकात निरीक्षकाकडून खुलासा मागविण्यात आलेला आहे. कालच तो प्राप्त झाला. या बाबत चौकशी करून सभागृहाला माहिती दिली जईल. प्रशासनाला ज्या मुद्याबाबत चौकशी करायची ती अपूर्ण आहे.

मा. सभापती : अंतिम चौकशी प्रशासन करेल.

श्री.गजनन बारवाल : जकात हा विभाग उत्पन्न देणारा आहे. अनेक वर्षापासून काही कर्मचारी त्याच विभागात आहेत. त्यांच्या बदल्या करणे गरजेचे आहे. आर.टी.ओ.विभागात गेल्या दोन महिन्यात किती वाहनांचे रजिस्ट्रेशन झाले त्यापैकी ५०% गाड्यावर जकात घेतली गेली नाही असे ठामपणे सूचना करतो.

श्री.अजिजजहागिरदार : या शहरात दररोज लाखो लिटर दारू येते. त्याचे गोडावून मनपा हद्दीबाहेर आहे. थोडे थोडे करून लहान वाहनाद्वारे दारू शहरात येते. त्याची संपूर्ण माहिती उत्पादन शुल्क विभागाकडे आहे. माहिती घेतल्यास शहरात किती दारू येते व जकात किती मिळते याचा हिशोब करता येईल.

मा. सभापती : स.सदस्यांची सूचना अत्यंत चांगली आहे. गोडाऊन शहराच्या बाहेर व दुकाने शहरात आहेत. त्याबाबत संपूर्ण सर्व्हे करून तो भाग मनपाच्या हद्दीत नसेल तरी मनपाच्या माहितीसाठी गोडावूनची पाहणी करून घ्यावी. मनपाच्या नियमात बसून कोणत्या दुकानावर किती माल जतो यासाठी पथक नियुक्त करून कार्यवाही करता येऊ शकते. जे गोडावून शहराच्या बाहेर आहेत त्याची संपूर्ण माहिती उपलब्ध करून घ्यावी. सभागृह जे निर्णय घेईल त्याप्रमाणे कार्यवाही होईल.

श्री.रेणुकादास वैद्य : जेव्हा बांधकाम परवानगी देतो तेव्हा बांधकाम किती होणार याबाबत माहिती असते. किती मटेरीयल लागेल हे समजते. तेवढ्या किंमतीच्या मालाचा जकात आला की नाही हे समजणे फारसे अवघड नाही. प्रशासनाकडून होत नसेल तर खाजगीकरण करण्यास काहीही हरकत नाही.

सौ. लता दलाल : लॉटरी तिकीआंवर व ऑनलाईन लॉटरीवर जकात घेतली जते का? घेत नसाल तर यापुढे जकात वसूल करावी. तसेच ऑप्टीकल्स व मोबाईलवर जकात आकारतो की नाही याचा सुध्दा खुलासा करावा.

श्री.गजनन बारवाल : व्यापारी वगै जे चेक जमा करतात ते रोजच्या रोजपाठविले जते का?

श्री.अजिजजहागिरदार : जी पुस्तके येतात त्यावर जकात कर आकारू नये असा शासन जी.आर.आहे. तरीसुध्दा २ ते ३% जकात वसूल केला जतो.

मा. सभापती : परिपत्रक आहे. अध्यादेश नाही. परिपत्रक व अध्यादेशामध्ये फरक असतो. आपण शालेय पुस्तके मोफत देतो. जकात माफीचा निर्णय घेवू नये.

श्री.कंवरसिंग बैनाडे : शहरात येणाऱ्या दुधावर जकात कर आकारला जतो का?

मा. सभापती : यापुर्वी स.सदस्यांनी जे मुद्दे उपस्थित केले त्याबाबत येणाऱ्या मटेरीयल प्रमाणे त्याची किंमत विचारात घेवून जकात आकारू शकतो का? येणाऱ्या मालाची किंमत किती, माल शहरात आल्यानपंतर त्याचा व्यापार करतात. एक लक्ष लिटर दूध येत असेल व त्याची किंमत साधारणत: ५ ते ७ लक्ष असेल त्यावर निश्चितपणे व्यापारी जदा पैसे घेतात. जे व्यापार करतो, पैसे कमवतो त्या मालावर जकात आकारणी करण्यास काय अडचण आहे. याबाबत निश्चितपणे प्रशासनाने कार्यवाही करावी. लॉटरी तिकीटे व ऑनलाईन लॉटरी बाबत सुध्दा प्रशासनाने अभ्यास करावा. जकात कशा प्रकारे आकारता येईल त्यासाठी प्रयत्न करावे. जे चेक घेण्यात येतात ते ज्या दिवशी घेतले त्याच दिवशी भरणा

करावे असा नियम आहे. सध्या कोणती पध्दत अवलंबिलेली आहे खुलासा करावा.

जकात अधिक्षक : जकात पोटी जे चेक प्राप्त होतात ते त्याच दिवशी जमा करून चलनद्वारे दुसऱ्या दिवशी बँकेत जमा केले जतात. चालू खातेचे चेक असतात. साधारणत: ५ तारखेपर्यंत चेक द्यावे अशी सूचना घालून देतो. ५ ते १० तारखेपर्यंत सर्व चेक उपलब्ध होतात. १० तारखेपर्यंत जेकाही चेक असतील ते जमा केले जतात. पिंपरी-चिंचवड महापालिकेचा मी नुकताच दौरा केला आहे. तेथे जेचेक उशीरा येतात त्यावर व्याजआकारले जते. तशा प्रकारे व्याज आकारणी संदर्भात विधी सल्लागार यांचे मत घेऊन कार्यवाही करता येईल. लॉटरीच्या तिटावर, दुध यावर जकात कर घेत नाही. लॉटरी तिकीटाच्या संदर्भात जी मशिनरी व त्यांचे पार्टस् आलेले आहेत त्यावर जकात कर वसूल केलेला आहे.

मा. सभापती : लॉटरी तिकीट म्हणजेजनतेची जिवनावश्यक बाब नाही. लॉटरी खेळणाऱ्यांची संख्या कमी झाली पाहिजे लॉटरीच्या तिकीटावर व ऑनलाईन लॉटरीवर जकात कर आकारण्यासाठी स्थायी समिती अथवा सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव सादर करावा.

मा. आयुक्त : लॉटरीवर जकात कर घ्यावा असे सभागृहाचे मत आहे. जे गुडस् कोठेही स्पेसीफाईड नाही त्यासंबंधी नियमात दुरूस्तीचा प्रस्ताव ठेवावा.

श्री. अजिजजहागिरदार : मोठमोठे डिलर्सचे मनपाकडे खाते आहे. गाड्या शहरात येतात नंतर चेक देतात व गाड्या शहरात आल्यानंतर वाटप होत असेल. परंतु त्या गाड्या येथेच विक्री होतात. त्यानंतर एक तक्ता तयार करून इतक्या गाड्या बाहेर विक्री केल्या, इतक्या गाड्या येथे विक्री केल्या. त्यात संपूर्ण जकात ते भरणा करीत नाही. ही पध्दत बरोबर नाही. शहरात गाड्या आल्यानंतर ती किती किंमतीत विक्री झाली तर व कोठेही विक्री केल्यास जकात वसूल केलाच पाहिजे

मा. आयुक्त : याबाबत प्रकरण सुप्रीम कोर्टापर्यंत गेले होते. व्यापाऱ्यांचे म्हणणे असे होते की, शॉप शहरात आहे परंतु विकत घेणारे शहराच्या बाहेरचे आहे ज्या जगेवर सेल झाला तेथे जकात आहे. सुप्रीम कोर्टाच्या ऑर्डरमध्येच नमूद आहे. सी.एन.ए.मध्ये काय होते, सेल येथे होतो त्यांना २% मिळतात. त्याबाबत रूलमध्ये नमूद करावे लागेल. उर्वरीत सेलवर जकात असणे आवश्यक आहे.

मा. सभापती : स.सदस्यांनी जे मुद्दा उपस्थित केला त्या संदर्भात ज्या एजन्सीचे दुकान शहरात आहे त्या एजन्सीच्या बुकवरून जे सेल होतो त्यानुसार निश्चितपणे जकात आकारणी करता येईल. बाहेरगांवी किंवा तालुका प्लेसला ज्या गाड्या गेल्या असतील तेथे वेगळे बुक असेल परंतु सर्वच गाड्यांचे व्यवहार या शहरात दुकान ठेवून करीत असतील तर जकात लावण्यास हरकत नसावी. तशी कार्यवाही करण्यात यावी.

श्री.गजनन बारवाल : सविस्तर खुलासा झालेला नाही. किती चेक पेंडींग आहेत, तसेच शहराबाहेर कोठे मोठमोठे गोडावून आहेत. ज्याचेपासून मनपास जकात मिळू शकेल. गाड्यांचे गोडावून कोठे आहेत तसेच प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून किती वाहनांचे रजिस्ट्रेशन झाले तयानुसार जकात मिळालेला आहे का?

जकात अधिक्षक : आतापर्यत एकही चेक शिल्लक नाही. जेवढे प्राप्त झाले तेवढे चेक जमा केलेले आहेत. शहरात आतापर्यंत १/४/२००५ ते २७/६/२००५ पर्यंत ६३८ वाहने शहरात आलेली आहेत. एकूण १०,५१,७५,५५६/- किंमतीची दारू शहरात आलेली आहे. ७३,७२,२९०/- रूपये जकात त्यावर मिळालेला आहे. १५,७९,३०,०००/- किंमतीची दोन चाकी वाहने शहरात आलेली आहेत. त्यावर २३,६८,९५०/- वसूली झालेली आहे. एकूण १४,६९,९७,५४५/- किमतीची चारचाकी वाहने आलेली असून त्यावर २१,९५,६६३/- रूपये वसूल झालेले आहेत. मोबाईल हँडसेट बद्दल मी पदभार घेतल्यापासून २७/१०/२००३ पासून २७/६/२००५ पर्यंत १,३३,३४३ मोबाईल हँडसेट आलेले आहेत. ७४,२६,१७,२८०/- त्याची किंमत आहे व २९,७४,६९१/- जकात वसूल झाली आहे. त्यावरील सीम कार्ड जे आलेले आहेत दि.२७/१०/०३ ते २७/६/०५ पर्यंत ३१,८६,१७,५००/- रूपयाचे आलेले असून त्यावर १,२७,४४,७००/- जकात मिळालेली आहे. सोने चांदीवर दि.१/४/२००५ ते २७/६/२००५ पर्यंत २,८२,२८,८००/- चे सोने आयात झाले असून २,८२,२८८/- रूपये जकात वसूल झाली. १/४/०५ ते २७/६/०५ या दरम्यान ५०,८२,५९,३९७/- रूपये किंमतीचा कपडा आयात झाला. १,६५,१८८/- जकात मिळालेली आहे. १/४/२००४ ते ३१/३/२००५ दरम्यान २१८ कोटींचा कपडा या शहरात आलेला आहे. त्यावर ४.३६ कोटी जकात मिळालेली होती. हेल्मेट दि.१०/५/०५ ते २७/६/०५ पर्यंत १,०९,२४,४००/- किंमतीचे हेल्मेट आले असून त्यावर २,७३,२१०/- रूपये जकात मिळाली. १/५/०५ ते २७/६/०५ पर्यत २,४१,३८,०००/- किमतीच्या वह्या शहरात आलेल्या असून त्यावर २,४१,३८०/- रूपये जकात मिळाली. गाईड जे आले आहे ते ५२,३५,१००/- किंमतीचे आलेले असून त्यावर ५२,३५१/- महसूल मिळालेला आहे. दि.१/४/०५ ते २७/६/२००५ पर्यंत रू.५,१८,२७,६५०/- किंमतीचे सीडस आयात झाले असून त्यावर १०,३६,५५३/- महसूल मिळालेला आहे.

मा. आयुक्त : दारूबंदी व उत्पादन शुल्क विभागास एक कर्मचारी पाठवून दोन दिवस बसून माहिती घ्यावी. गोडावून बाहेर आहे तेथे सुध्दा माहिती आहे. तसेच आर.टी.ओ.कार्यालयात किती वाहनांचे रजिस्ट्रेशन झाले ती सुध्दा माहिती घ्यावी. तसेच जकातीचे संगणकीकरण केल्यास पावती बुकबद्दल तक्रार असणार नाही. बजेटमध्ये तरतुद ठेवण्यात येत आहे. या विभागात जे कर्मचारी अनेक वर्षापासून काम करतात त्यांचे व नवीन जे असतील ज्यांची तक्रार असेल त्या कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्याचे प्रस्तावित आहे.

श्री.रेणुकादास वैद्य : मागच्या बैठकीत ट्रान्झीट पास संबंधी मुद्दा उपस्थित केला होता. नाक्यावर पास घेतला की माल शहरातच उतरायचा गाडी पुढे जत नाही. अनेक कंपन्या अशा आहेत की त्यांनी एजन्ट नियुक्त केले आहे माल येतो,बाहेर काढतात. हे का परस्पर चालू असते या बाबत काय कार्यवाही केली आहे.

जकात अधिक्षक : कालच मी पिपंरी चिंचवड महापालिकेतून या संदर्भात माहिती घेतली आहे मा.आयुक्त यांनी मला निर्देश दिलेले आहेत. डिपॉजेट पध्दत किती कडक करता येईल यावर विचार चालू आहे.पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये डिपॉजेट सिस्टीम नाही तेथे नाक्यावर माल आल्यानंतर तीन प्रतीत नोंद होते एक प्रत नाक्यावर व एक प्रत ट्रान्सपोर्ट कडे असते व एक प्रत उपआयुक्त यांचे कडे दिली जते माल ट्रान्स्पोर्टच्या गोडाऊनला उतरविला जतो जेव्हा मूळ मालक माल घेण्यास जईल तेंव्हा त्यांनी जकात विभागात जऊन रितसर जकात भरणा करावी व त्यानंतर त्या ट्रान्सपोर्ट धारक त्यांना माल देतात.

श्री.रेणूकादास वैद्य : या महानगरपालिकेत कशी पध्दत अवलंबविल्या जते तेव्हढाच खुलासा करण्यात यावा.

जकात अधिक्षक : या महानगरपालिकेत आपण डिपॉजेट सिस्टम आहे जेव्हढा माल औरंगाबाद महानगरपालिका हद्दी बाहेर जतो. एल.आर. नोंद झालेली असते एलआर प्रमाणे माल नाक्याच्याबाहेर जतो तेंव्हा तपासणी केली जते माल बाहेर गेल्यानंतर डिपॉजेटचे पैसे परत केले जतात. १६३ तासाच्या आत तो माल शहराच्या बाहेर जयला पाहिजे जर गेला नाही तर डिपॉजेट मुदतवाढ करून घेण्याची पध्दत आहे त्या बाबत काळजी घेतो. जकाती एवढीच अनामत घेतली जते.

मा.सभापती : जकात अधिक्षक यांनी सक्षमतेने काम करावे जस्तीत जस्त जकात कशी वसूल करावी हा सर्वांचा दृष्टीकोन आहे विशेष पथक नियूक्त करण्याचे सूचना दिल्या होत्या काय अडचण आलेली आहे माहिती दयावी.

श्री. शंशाक विसपूते : मागील बैठकीत मी शिवाजीनगर जे गेट आहे बीडबायपास रस्त्याने जे माल येतो तो शिवाजीनगर मार्गे शहरात येतो ९० टक्के तेथे जकात चोरी होते.त्या ठिकाणी स्कॉड नियुक्त करण्या बाबत सूचना दिलेल्या होत्या अद्याप कार्यवाही नाही.

मा.सभापती : शिवाजीनगर जटवाडा, रेल्वेक्रॉसींग जवळपास ५ते ७ ठिकाणी एका व्यक्तीवर काम सोपविण्यात आलेले आहे तेथील व्यक्ती अत्यंत जबाबदारीने सक्षमपणे काम करणारी असावी. तशा कर्मचाऱ्यांची नियुक्त करावी तसेच स्कॉड तयार करून जे चोरी होते ती रोखण्यात यावी.

श्री.मिलींद दाभाडे : शहरात ज्या मेडीसीन कंपन्या आहेत त्यांचेसाठी रॉमटेरीयल किती येते आतापर्यत किती जकात वसूल करण्यात आलेली आहे.

श्री.अजीजजगीरदार :एखादया ट्रकमध्ये १ लक्ष चा माल असतो बिल मात्र रू.२२,०००/-असते सेन्ट्रल नाक्यावर गाडी गेल्यानंतर सदर माल हा वेगवेगळया दूकानाचा असतो ओपन डिलेवरी सेन्ट्रल नाक्यावर देतात का ?ओपन डिलेवरी केल्यास निश्चितच जकात वाढेल.

मा.सभापती : मेडीसीन कंपनीसाठी येणारे रॉमटेरीयल बाबत प्रश्न उपस्थित केला तसेचओपन डिलेवरी करण्याबाबत अनेकवेळा सभागृहात चर्चा झालेली आहे काही व्यापाऱ्यांनी विरोध पण केलेला होता.परंतु ज्या मालाच्या बाबत शंका येत असेल तर त्या मालाची ओपन डिलेवरी सेन्ट्रल नाक्यावर गोडाऊन आहे

तेथे करावी कोणाच्याही दबावास बळी न पडता कार्यवाही सुरू करावी व जकातीचे उत्पन्न वाढवावे अशा सूचना प्रशासनास देण्यात येत आहे.

जकात अधिक्षक : एकूण चार मेडीसिन कपंन्या आहे रॉमटेरीयल किती येते जकात किती वसूल झाली याची माहिती संकलण करण्यास वेळ लागेल. सध्या माझ्याकडे माहिती उपलब्ध नाही.

मा.सभापती : प्रशासनास माझी सूचना आहे की,या शहरातील किती कारखाने बंद पडले आहे उत्पादन किती कारखान्यात चालू आहे.गेल्या पाच ते सात वर्षात येणारे कंपन्यासाठी मटेरीयल व येणारी जकात आणि सद्यस्थितीत येणारे मटेरीयल व वसूल होणारी जकात किती यांचा विचार होणे आवश्यक आहे ज्या कपंन्यासाठी रॉमटेरीयल येत आहे त्याकडे लक्ष ठेवण्याची गरज आहे जे उद्योजक असतील त्यांच्या अडचणी लक्षात घ्याव्यात शेवटी जकात हे महत्वाचे उत्पन्नाचे साधन आहे. गेल्या वर्षात १३४ कोटीचे बजेट होते त्यातून ७०-७३ कोटी रू जकात या माध्यमातून मिळालेले होते .नियमामध्ये बसवून जे काही प्रशासनास फेरबदल करता येत असेल ते करावे मोठया प्रमाणात उत्पन्न वाढवावे.एमआयडीसी भागात सर्वे करण्याची गरज आहे ज्या कपन्या बंद पडलेल्या आहे त्या का बंद पडलेल्याआहे त्याची कारणे शोधावी हे शहर मराठवाडयाचे केंद्र असल्याने व शहराचा विकास होण्याचे दृष्टीने मोठे उद्योजक येथे येतील या दृष्टीने कार्यवाही करावी. गुजरात राज्यात अहमदाबाद शहरात मोठमोठया कंपन्या असून`तेथे मोठया प्रमाणात औदयोगिकरण वाढत आहे येथे सर्व व्यवस्थाअसतांना मोठमोठे उद्योग का शिफ्ट होत आहेत याची माहिती घेऊन ती सभागृहा समोर ठेवावी.

श्री.रेणूकादास वैद्य : पूंडलिकनगर भागातील नाला वळविण्यात आला होता ती जगा आरक्षणात येते का ? नाला आहे त्या परीस्थितीत योग्य आहे का त्याचे लोकेशन बदलले का या सर्व बाबीचा खुलासा करण्यात यावा.तेथे अनधिकृत बांधकाम होत आहेत,प्रशासनाने काय कार्यवाही केलेली आहे.

सहा.संचालक(न.र) : गारखेडा येथील नाल्याच्या बांधकाम संदर्भात या विभागाकडूनपरवानगी देण्यात आलेली नाही. अनधिकृत होत आहे म्हणून प्रशासकीय विभागास कळविण्यात आलेले आहे हा प्रश्न त्या विभागाशी संबधीत आहे.तेथे सबडिस्टीक सेन्टरचेआरक्षण आहे त्यामध्ये वाणिज्य सुविधा व तत्सम सुविधा उपलब्ध करून द्यावयाच्या आहेत.

मा.सभापती : जे काही भूखंड राखीव ठेवले त्यापैकी हा एक आहे का? आरक्षणातून वगळलेले आहे का? नाला कोठून जतो, रेखांकनाची सद्य:स्थिती काय आहे? योग्य खुलासा अपेक्षीत आहे.

सहा.संचालक(न.र) : वाणिज्य सुविधा उपलब्ध करून देण्याच्या संदर्भात संबधीत मालक विकास करू शकतात.परंतू तसा कोणताही प्रस्ताव संबधीत मालकाचाआलेला नाही.व भूसंपादन ही केलेले नाही.

सौ.लता दलाल : चूकीचा खुलासा देत आहे आरक्षण असेल तर संबधीत मालक विकास करू शकतात असे उत्तर दिले परवानगी घेतलेली नसेल तर कसा विकास करू शकतील.

मा.आयुक्त : त्या जगेवर बांधकामास परवानगी देण्यात आलेली नसेल तर तसे प्रशासकीय विभागास कळवावे.

मा.सभापती :आरक्षीत जगेवर जमीन मालक विकास करू शकतात की महानगरपालिकेने करावा. जमीन मालकास बंधनकारक नसते माझ्या माहितीनूसार ती जगा आरक्षण कशासाठी आहे व भूसंपादन करावी की नाही एवढाच खूलासा करण्यात यावा.

मा.आयुक्त : ज्या कारणासाठी आरक्षण आहे त्या जगेवर तेच बांधकाम झालेले असावे यात दोन पध्दती आहे एक तर महानगरपालिकेने जगा भूसंपादन करून विकास करायचा दुसरे असे की ज्यासाठी ती जगा आहे तेच बांधकाम त्या मालकांनी तेथे करावे २५टक्के भाग महापालिकेस दयावा व एफएसआय वापर करून बाधकाम करावे .या दोन्ही पैकी कोणत्याही प्रकारे बांधकाम झालेले नाही म्हणून अनाधिकृत होत आहे कार्यवाही होणे अपेक्षीत आहे.

प्रशासकीय अधिकारी : गारखेडा परीसरातील आरक्षण क्र. २२९ येथे पूर्वी सूरू असलेल्या नाल्याचा नैसर्गीक प्रवाह वळवून त्या जगेवर कॉन्क्रेटींग करून स्लॅब टाकण्याचे काम साधारण: २१.५.२००५ रोजे सूरू केलेले होते त्या संदर्भात दिं. २१.५.०५, २५.५.०५,२६.५.२००५, ३.६.२००५,१०.६.२००५ आणी १९.६.२००५ या दिवशी वेळावेळी सदरचे बांधकाम तोडून तेथीलसाहित्य जप्त करण्यात आलेले होते हे बांधकाम सूरू ठेवत असल्यामूळे दिं. ७.६.२००५ रोजे संबधीतास एमआरटीपी अॅक्ट १९६६ चे कलम ५४ अन्वये नोटीस तामील करण्यात आली पोलीसात गून्हा दाखल करण्याचे विचाराधीन असतांना संबधीत जगेचे मालकी हक्काचे कागदपत्र उपलब्ध न झाल्याने पोलीस गून्हा अदयाप दाखल केलेला नाही .

श्री.रेणूकादास वैद्य : चूकीचा खुलासा देत आहेत. २१ तारखेला त्याचेकडे माहिती मिळाली सर्व वृत्तपत्रात २० तारखेला बातमी आली याचा अर्थ सदरचे काम हे १९ तारखेच्या अगोदर पासून सुरू असावे. माहिती घेण्यास इतका उशीर का ? तीन महिण्यापासून तेथे बांधकाम चालू आहे.

सौ.लता दलाल: : तेथे आरक्षण आहे परवानगी दिली नाही म्हणून टी.पी. विभागाने कळविले असतांना मालकी हक्का बाबतची कागदपत्रे कशासाठी मागविण्यात आली.तात्काळ बांधकाम पाडले का नाही.यात कार्यवाही करण्याबाबत कूचराई झालेली आहे मी मारल्यासारखे करतो तुम्ही रडल्या सारखे करा असा हा प्रकार झालेला आहे.

मा.आयुक्त : संबधीत अधिकारी यांना सुचना की सदरचे बांधकाम पाडण्यात यावे त्या जगेचे छायाचित्र काढूनपूढील बैठकीत मा.सभापती यांना दाखवावे मालकी हक्काचे कागदपत्र न मिळाल्यास जे मजूर किंवा मुकादम काम करतो त्याचे विरूध्द (अननोन पर्सन) गून्हा दाखल करावा.

सौ.लता दलाल : मागच्या बैठकीत मूद्दा उपस्थित केला होता पार्कींगच्या जगेवर बांधकामे झालेली आहे पार्कींग प्लेस सोडलेली नाही बेसमेन्टच्या ठिकाणी पार्कींग नाही जगाच सोडलेल्या नाही त्यामूळे जे एफएसआय देय आहे त्यापेक्षा जस्तीचा एफएसआय वापरलेला आहे त्यामूळे पार्कींग साठी जगा नाही रस्त्यावर अनेक

वाहने उभी राहतात जनतेला त्रास होतो आहे त्या संदर्भात या बैठकीत माहिती देणार होते रस्ते डांबरीकरण होतात राजरोजपणे रस्त्यावर गॅरेजेस चालू असतात सविस्तर माहिती देण्यात यावी तसेच ज्यासंचिका गहाळ आहे मागिल बैठकीत उल्लेख केला होता त्या संचिका मिळाल्या की नाही तोही खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती : बाधंकाम परवानगी दिल्या जते त्यानंतर इमारत बांधकाम पूर्ण झाल्यानंतर पुर्नत्वाचे प्रमाण पत्र दिल्या जते ते किती इमारतीना दिलेले आहे. जर परवानगी घेतली नसेल व बांधकाम केल्यानंतर संबधीत जे कूणी इमारत मालक शॉप फ्लॅट विक्री करू शकतात का ? तसेच पार्कींगच्या जगेत बेसमेंन्टच्या जगेत दूकाने झालेली असून किती ठिकाणी असे दिसून आलेले आहे ज्यांनी पार्ट कम्प्लीशन घेतले नाही, का घेतले नाही. तसेच मागील बैठकीत ज्या ३-४ संचिकेबाबत उल्लेख केलेला होता त्यासंचिका उपलब्ध आहेत का? त्या संचिकेचा नंबर व तसेच ज्या इमारतीना परवानगी दिली ती सर्व कागदपत्र त्यात आहेत का ?याचा सविस्तर खुंलासा करण्यात यावा.

सौ.लता दलाल : ओपनस्पेस नाल्यामध्ये दाखविता येते का? तसे दाखविल्या गेले का व त्याप्रकारे परवानगी दिलेली आहे का?

सहा.संचालक(न.र.) : जेथे डेव्हलपमेन्ट प्लॅन नुसार नाला यूजर दाखविला असेल तर ओपन स्पेस दाखविता येत नाही खाजगी जमीन असेल तेथे नाला वगैरे दाखवला नसेल तर डेव्हलपमेन्ट प्लॅन नुसार दाखविला गेला असेल जे की अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आले नसेल तर असा प्रकार कोठे झाला त्या बाबत स.सदस्यानी माहिती दिली तरत्यावर अभ्यास करून कार्यवाही करता येईल.

सौ.लता दलाल : सिटी एस नंबर २०५९२ निरालाबाजर रस्त्यावर जे विकास झालेला आहे तो नाला यूजर नाही का त्या नाल्यास प्रवाह नाही का संरक्षित भिंत नाही का सदर नाला मोढा दलालवाडी पासून ते पुष्पनगरी पर्यंत वाहत जतो त्या नाल्यावर ओपनस्पेस दाखविल्या गेल्या, डेव्हलप करण्यासाठी परवानगी दिली का . त्या ठिकाणी किती एफएसआय वापरला गेला? तेथे पार्कींगची जगा सोडलेली आहे का ?

सहा.संचालक(न.र.) : या बाबत पूढील सभेत सविस्तर माहिती देण्यात येईल.

मा.सभापती : स.सदस्याकडून माहिती घेण्याची अपेक्षा करू नये हे अत्यंत चूकीचे आहे परवानगी आपला विभाग देणार, संचिका विभाग हाताळणार स.सदस्याकडून कशासाठी माहिती अपेक्षीत आहे. आपला विभाग काय करतो अधिकारी यांनी जेवढी माहिती असेल तेवढीच माहिती दयावी.पूढील सभेपासून स.सदस्याकडूनमाहिती घेण्याचा प्रयत्न केल्यास त्या अधिका-यावर कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल, याची नोंद घेण्यात यावी.

सौ.लता दलाल : संपूर्ण शहरातील नाल्याबाबत प्रश्न विचारलेला आहे, नाला ओपन स्पेसमध्ये दाखवला का? प्रशासनाकडे माहिती नसेल तर माझ्याकडून माहिती घ्यावी.

मा.आयुक्त : नाले नकाशावर आले आहेत का. जरी नसेल तर जगा प्रत्यक्ष ताब्यात घेताना लक्षात येते. या संदर्भात स.सदस्य फार तर एरीया सांगू शकतील. त्यांना सी.स.नंबर विचारण्यात येऊ नये. याबाबत तपासणी करण्यात यावी. नाल्यावर

खुली जगा दाखवू नये. नाल्यावर बांधकाम होऊ नये म्हणून टॉप प्रायॉरीटी द्यावी. प्रशासकीय अधिकारी यांनी दखल घ्यावी.

मा.सभापती : पूर्वी केलेले असतील त्या काम ऐवजी सध्य परीस्थिती जेथे अशा प्रकारची कामे चालू असतील तर ती रोखण्यात यावी तसेच पार्कींगच्या जगेच्या संदर्भात, बेसमेंटच्या जगेच्या बाबतीत ही कार्यवाही करण्यात यावी. ज्ञानेश्वरनगर येथील नाला व्यवस्थीत करून देण्या बाबत कार्यवाही व्हावी यापूढे स.सदस्याकडून माहिती घेण्याची गरजनाही सहा.संचालक नगररचना हे शासनाकडून आलेले अधिकारी आहेत सक्षम आहात एक भाग सांगितला की लक्षात यावयास पाहिजे

श्री.अजेजजगीरदार : सूतगिरणी ते शहानूरमिया दर्गा रस्त्यासंदर्भात मी मूद्दा मांडला खुलासा करावा.

श्री.मिलींद दाभाडे : देशी दारूच्या अनधिकृतपणे चालू असलेल्या दूकान बाबत ही खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती : सभागृहात स.सदस्य श्री अजेज जगीरदार प्रश्न उपस्थित केलेला आहे या रस्त्याच्या संदर्भात यापूर्वी सभागृहात चर्चा झालेली होती त्या रस्त्याच्या संदर्भात चर्चा होऊन एक चौकशी समिती नियूक्त केलेली होती. अहवाल प्राप्त झालेला होता चौकशी अहवाल बाबतचा खुलासा अति.शहर अभियंता यांनी करावा.

अति.शहर अभियंता :एकता चौक ते गारखेडा सुतगिरणी या रस्त्याचे काम सन २००० मध्ये करण्यात आले होते, ६ वर्ष पूर्ण झालेले आहे चौकशी अहवालाच्या संदर्भात माहिती माझ्या कडे उपलब्ध नाही परंतू सदर रस्ता २००० साली करण्यात आला होता त्यानंतर त्या रस्त्यावर काम करण्यात आलेले नाही.

मा.सभापती : या रस्त्याच्या संदर्भात सन २००० मध्ये एक चौकशी समिती नियुक्त केलेली होती त्या समिती मधये अधिक्षक अभियंता श्री सोनी साहेब होते.

अधिक्षक अभियंता : सन २००० मधे हा रस्ता तयार केला यात दोन पार्ट आहे पहिल्यादा डब्लयू बी.एम रोड करण्यात आलेला होता दूसऱ्यांदा डांबरीकरणा करण्यात आले डांबरीकरणाचे काम डी. अजेतसिंग या ठेकेदाराने केलेले होते त्या कामावर काही ठिकाणी मोठमोठे खड्डे पडलेले होते निवीदाच्या अटीनूसार १ वर्षाची गॅरंटी होती, ज्या ठिकाणी काम खराब झालेले आहे, जे रस्ता खराब झाला ते काम त्याच गुत्तेदारांनी दुरूस्त करून द्यावा. जेथे काम खराब झालेले होते त्या संदर्भात चौकशी सुरू झालेली आहे. त्यावेळी मी कार्यकारी अभियंता म्हणून होतो. या रस्त्याच्या संदर्भात मा.विभागीय आयुक्तांमार्फत चौकशी झालेली आहे त्याचा रिपोर्ट महानगरपालिकेस आलेला आहे त्या बध्दल मला माहिती नाही. परंतु सन २००० मध्ये हा रस्ता केला होता. २००० नंतरही सरफेसींग त्याच ठेकेदाराकडून करून घेतले. त्यांनंतर पाच ते सहा वर्षात पुन्हा त्या रस्त्यावर खर्च झालेला नाही.

श्री.अजेजजगीरदार : सदर रिपोर्ट सभागृहात ठेवावा .संबधीत गुत्तेदार डी.अजेतसिंग यांनी त्या रस्त्याचे ७८ लक्षचे काम केलेले आहे.तेच ठेकेदार यांना आता विषय क्र ९ नूसार ३० लक्षचे काम देणार आहात का ?

मा.सभापती : विषय क्र९ जेंव्हा चर्चेला येईल तेंव्हा चर्चा करावी.

श्री.शंशाक विसपूते : मागच्या बैठकीत अतिक्रमण हटविणया बाबत निर्देश दिले होते काय कार्यवाही करण्यात आलेली आहे.

श्री.कवरसिंग बैनाडे : औरंगपूरा भागात अतिक्रमण काढण्याची कार्यवाही सूरू असतांना कूणाचा तरी मोबाईल आला त्यानंतर लगेच कार्यवाही बंद करून तेथून पथक परतले याबाबत कुणाचा मोबाईल आलेला होता माहिती देण्यात यावी.

प्रशासकीय अधिकारी : दिं २१.६.२००५ रोजे औरंगपूरा भागात सांयकाळी ७.३० वाजता अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही करण्यात आली. अतिक्रमण पथकाच्या गाडीत सर्व हातगाडया टाकल्यानंतर ती गाडी पूर्ण भरल्यामूळे रिकामी करण्यासाठी रेल्वेस्टेशन भागात पाठविण्यात आलेली होती कूणाचाही मोबाईल वगैरे आलेला नव्हता.

मा.सभापती : एकदा धोरण ठरविल्यानंतर ते प्रामाणिकपणे राबविणयात यावे ही सदस्यांची इच्छा आहे वृत्तपत्रात तसे आले म्हणून सूचना केलेली आहे त्यात थोडे फार तथ्य असू शकते.

श्री. दाभाडे मिलिंद : सूपारी हनूमान रस्त्यावर महानगरपालिकेचे भोलेश्वर मार्केट आहे तेथील पार्कींगच्या जगेत एक दूकान चालू आहे त्या व्यक्तीने अतिक्रमन केले की परवानगी दिली खुलासा करावा. परवानगी दिली असेल तर तशी परवानगी देता येते का?

श्री.बैनाडे करवसिंग : यानंतर स्थायी समितीची सभा ही दूपारी ३.००वाजेनंतर आयोजित करावी अशी सभागृहाच्या वतीनेविनंती आहे.

मा.सभापती : आपल्या सूचनेचा विनंतीचाविचार केला जईल.

प्रशासकीय अधिकारी : भोलेश्वर मार्केटच्या पार्कीगंच्या जगेत दूकान चालू करण्या संदर्भात मालमत्ता विभागाकडून कार्यवाही झालेली असावी

श्री.बारवाल गजनन : त्या जगेवर कोठेही अतिक्रमण असल्याचे दिसून येत नाही.

मा.सभापती : प्रशासकीय अधिकारी यांनी स्थळ पाहनी करावी.

श्री मिलींद दाभाडे : अनधिकृत देशी दारूच्या दूकान संदर्भात खुलासा देण्यात यावा दलित वस्त्यात देशी दारूच्या दूकाने आहेत वारंवार प्रश्न करीत आहे १५ दिवसात कार्यवाही करणार होते माहिती देण्यात यावी.

प्रशासकीय अधिकारी : शहरात ५२ झोपडपट्टयात विविध ठिकाणी देशी दारूच्या दूकाना अस्तित्वात असून सदर दूकानांना उत्पादन शूल्क कार्यालय व मा.जिल्हाधिकारी कार्यालयाकडून परवानगी देण्यात आलेली आहे. सदर बाबतीत वरील कार्यालयाकडून कार्यवाही होणे उचीत वाटते.

श्री.मिलींद दाभाडे : चूकीची माहिती देत आहे सर्वच दूकाने ही अनधिकृत वस्त्यात नाही अधिकृत वस्त्यासूध्दा आहेत.

प्रशासकीय अधिकारी :समर्थनगर येथील एक दूकान हे एकतानगर भागात दिं ५.३.२००४ रोजे स्थलांतराची परवानगी देण्यात आली त्याची प्रत प्राप्त झालेली आहे सदर कार्यवाही ही जिल्हाधिकारी कार्यालय व उत्पादन शूल्क कार्यालया मार्फत झालेली आहे.

श्री.मिलींद दाभाडे :लायसन्स बाबत मी बोलत नाही अनधिकृतपणे इमारतीत ती दुकाने चालू आहे काय या संदर्भात माझा प्रश्न आहे.

प्रशासकीय अधिकारी : साधारणपणे अनधिकृत वस्तीत बांधकाम परवानगी दिल्याचे दिसून येत नाही. मालमत्ता कर व इतर अभिलेख त्या दूकानदाराने सादर केलेला आहे जर अटी शर्ती नूसार सदउर दूकान चालू नसेल तर संबधीत कार्यालयाकडून कार्यवाही होणे अपेक्षीत आहे.

श्री.मिलिंद दाभाडे :परवानगी देतांना भ्रष्टाचार झाला असेल संबधीतास का पाठीशी घालण्याचा प्रयत्न करीत आहे. बांधकाम संबधी कोणता विभाग येतो.

श्री.बारवाल गजनन : सदरील दुकानचे बांधकाम हे अनधिकृत आहे असे मत स.सदस्य यांचे आहे कार्यवाही अपेक्षीत आहे.

मा.सभापती : सदर दूकाना बाबत त्या वस्तीतील महिला वइतर नागरीक यांचा ५०टक्के लोकांचा विरोध असेल तर कार्यवाही तात्काळ होईल. प्रशासकीय विभागाने चौकशी करावी व तात्काळ कार्यवाही करावी आता विषय पत्रिकेवर चर्चा करावी.

**विषय क्र. ०९ :**

**(दि.२०/६/२००५ च्या सभेतील स्थगित ठेवण्यात आलेला प्रस्ताव क्र.८)**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, शिवाजी महाराज पुतळा ते मुकुंदवाडी रेल्वेस्टेशन रस्त्याचे डांबरीकरण करणे/खडीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक र.रूपये ३०,५३,०८५/- चे असून सदर कामाच्या अंदाजपत्रकास दिनांक ४/१/२००५ रोजी संपन्न झालेल्या मा.सर्वसाधारण सभेमध्ये विषय क्र.५१५/३ नुसार मंजुरी मिळालेली आहे.

सदर काम करण्यासाठी निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत ८(आठ) निविदा विक्री झाल्या व त्यापैकी तीन निवदा दर भरून प्राप्त झाल्या, त्या खालील प्रमाणे आहेत.

१. श्री. डी.अजितसिंग ०.०५% कमी दराने

२. मे. ए. एस. कन्स्ट्रक्शन ५% जस्त दराने

३. मे. आदिनाथ कन्स्ट्रक्शन इ.एम.डी.नसल्यामुळे निविदा उघडण्यात आली नाही.

प्राप्त निविदांपैकी सर्वात कमी दराची निविदा ही श्री.डी.अजितसिंग यांची असून ती अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०५% (शुन्य पॉइंट शुन्य पाच टक्के) कमी दराची आहे. मा.आयुक्तांनी कंत्राटदाराशी केलेल्या दराच्या वाटाघाटीनंतर, कंत्राटदाराने अं.प.दरापेक्षा २%(दोन टक्के) कमी दराने काम करण्यास संमती दिलेली आहे. तरी श्री.डी.अजितसिंग यांची अं.प.दरापेक्षा २%(दोन टक्के) कमी दराची निविदा मान्यतेस्तव तथा स्विकृती करीता सादर.

**संवाद :**

श्री.गजनन बारवाल : या प्रस्तावा संदर्भात सर्व काही कार्यवाही झालेली असून वाटाघाटी झालेल्या असून प्रस्ताव मंजूर करण्यास हरकत नसावी.

श्री.कवरसिंग बैनाडे : आताच डी अजेतसींग यांनी सूतगिरणी ते शहानूरमिया दर्गा पर्यतंच्या रस्त्या बाबत शहर अभियंता यांनी खुलासा करतांना म्हटले की रस्त्यावर खड्डे पडले होते चौकशी चालू आहे. ते आत दूरूस्त केले असतील परंतू रस्ता करतांनाच का व्यवस्थित केलेला नव्हता.या गूत्तेदारालाच का पून्हा काम दयावे यावर विचार करावा विभागीय आयूक्त मार्फत चौकशी झालेली आहे त्याचा रिर्पोट देण्यात यावा.

श्री.बारवाल गजनन : विभागीय आयूक्त मार्फत चौकशी सूध्दा झालेली आहे जेव्हा काम चालू होते तेव्हा जस्त प्रमाणात त्या रस्त्यावरून वाहतूक चालू होती जेकाम ६ वर्ष टिकते याचा अर्थ योग्य प्रकारे काम केलेले आहे प्रस्ताव मंजूर करावा.

श्री.अजीजजगीरदार : विभागीय आयूक्त यांचा चौकशी अहवाल सादर करावा त्यानंतर हा प्रस्तावावर विचार व्हावा संबधीत ठेकेदार त्यात दोषी असतील तर हे काम त्यांना देण्यात येऊ नये रद्य करावे.

श्री.रेणूकादास वैद्य : संबधीत ठेकेदार यांनी पूर्वीचे रस्त्याचे काम हे योग्य केले किंवा नाही हे ठरविण्याचा भाग वेगळा आहे. हा रस्ता होणे आवश्यक आहे अहवाल काय आहे तो मागवावा दोषी असेल तर कार्यवाही करावी परंतु प्रस्तावानूसार या कामास मंजूरी दयावी व तातडीने या रस्त्याचे काम सूरू करावे.

श्री.बारवाल गजनन : हा जे भाग आहे तो अतिशय महत्वाचा भाग आहे निविदा प्राप्त झाली हि निविदा मंजूर करावी अशी विनंती आहे.

श्री.अजीजजगीरदार : रस्ता करण्यास माझा विरोध नाही एजन्सी बदलून दयावी तरच रस्ता व्यवस्थित होईल. अहवाल येत नाही तोपर्यत हा प्रस्ताव स्थगित ठेवावा.

सौ.लता दलाल : चौकशी चालू असतांना संबधीत व्यक्तीला दोषी ठरविणे योग्य नाही.

श्री.अजीजजगीरदार : या संदर्भात चौकशी झालेली असून रिपोर्ट महानगरपालिकस प्राप्त आहे सभागृहासमोर सादर करावा.

मा.सभापती :या सभागृहात हे नमूद करू इच्छितो की कूणाची शिफारस करणार नाही ही चर्चा सर्वसाधारणा सभेत सूधदा झालेली होती त्या रस्त्याच्या कामाची चौकयी व्हावी असा ठराव घेतला त्यानूसार विभागीय आयूक्त याचे मार्फत एक समिती नियूक्त केलेली होती त्या संबधीचा अहवाल माझयामाहिती प्रमाणे पूर्वीच्या सभागृहासमोरच आलेला होता त्या ठेकेदारानेकाम खराब केले असते व गैरशेरा त्याांचे नावे असता तर प्रशासनाने त्यांना निविदाच दिली नसती. जेथे नियमाची तरतूद आहे तेथे कुणी बगल देणार नाही असे माझे मत आहे. हे काम करण्याची आवश्यकता आहे हा रस्ता पुंडलिकनगरच्या तसेच जवळपास बऱ्याच भागातील जनतेशी निगडीत आहे. हा रस्ता चांगला करण्याच्या दृष्टीने संबंधीत अधिकाऱ्यांनी लक्ष द्यावे. या प्रस्तावास मंजूरी देण्यात येते.

श्री.अजीजजगीरदार :मंजूरी देण्यास माझा विरोध नोंदवावा .

श्री.रेणूकादास वैद्य : निवडणूकीच्या पूर्व काळात २.१५ कोटी रू. रस्त्याची कामे करण्यात आलेली आहे. तसेच ९० लक्षचे सौदर्यीकरणाची कामे झालेली असून तातडीने ती करण्यात आलेली आहे व त्या कामाच्या बाबतीत प्रशासनाचे कसल्याही प्रकारचे नियंत्रन नव्हते असे माझे मत आहे या सर्व कामाची चौकशी होणे आवशक आहे.महानगरपालिकेचा पैसा काही अंशी वाया गेलेला आहे या कामाच्या संदर्भात एक दोन अधिकाऱ्यांची समिती नियूक्त करावी व चौकशी अहवाल या सभागृहासमोर ठेवण्याच्यासूचना कराव्यात.

श्री.विनायक पांडे : एक मोठा पाऊस झाला परंतु त्यात दोन तीन महिणयापूर्वीच झालेल्या रस्त्यांना मोठमोठे खड्डे पडलेले आहे त्याची चौकशी होणे आवशक असून संबधीत ठेकेदार यांचेवर कार्यवाही होणे आवशक आहे.

मा.सभापती : रूपये २.६५ कोटीचे रस्त्याची कामे झालेली असून तसेच ९५ लक्ष चे बेट सौदर्यीकरणाची कामे करण्यात आलेली आहे यासंपूर्ण कामाची अधिक्षक अभियंता यांनी पाहणी करावी व त्या संबधीचा अहवाल यासभागृहासमोर ठेवावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शिवाजे महाराज पुतळा ते मुकुंदवाडी रेल्वेस्टेशन रस्त्याचे डांबरीकरण करणे/खडीकरण करणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारकाशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदरील काम श्री.डी.अजितसिंग यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% कमी दराने करून घेण्यास बहुमताने स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १० :**

आरोग्य वैद्यकीय अधिकारी, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, सिडको एन-८ रूग्णालय मनपा औरंगाबाद येथील आरोग्य सेवेचे बळकटीकरण करून आरोग्य विषयक कामाचा संख्यात्मक व गुणात्मक दर्ज सुधारण्याकरीता तसेच मनपा अंतर्गत तज्ञ वैद्यकीय अधिकारी यांच्या कमतरता लक्षात घेऊन सदरील रूग्णालयात होणाऱ्या गुंतागुंतीची प्रसूती, स्त्री व पुरूष नसबंदी शस्त्रक्रिया, नेत्ररोग व अंधत्व निवारण, कुटुंब कल्याण माता बाल संगोपन व इतर सर्व राष्ट्रीय कार्यक्रम राबवण्याकरीता महात्मा गांधी मिशन (एम.जी.एम.वैद्यकीय महाविद्यालय) यांच्या विनंती नुसार आरोग्य सेवा देण्यासाठी सेवाभावी प्रवृत्तीने तज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांची सेवा सिडको एन-८ रूग्णालय येथे खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून एम.जी.एम.रूग्णालयास उपलब्ध करून देण्यास योग्य राहील.

१. सिडको एन-८ येथील उपलब्ध असलेल्या २० खाटी रूग्णालय यावर भविष्यात एम.जी.एम.रूग्णालय यांचा काहीही हक्क राहणार नाही.
२. प्रशासकीय व सर्व नियंत्रण महानगरपालिकेचे राहील.
३. फक्त सेवाभावी प्रवृत्तीने आरोग्य सेवा व तज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांची सेवा उपलब्ध करून द्यावी, सर्व प्रकारची आरोग्य सेवा व तज्ञांची सेवा विनामुल्य राहील.
४. गुंतागुंतीच्या रूग्णांना संदर्भ सेवा बाबत मार्गदर्शन व सल्ला देणे ही तज्ञ डॉक्टरांची जबाबदारी राहील. परंतु सल्ला दिल्यानंतर कोणत्या रूग्णालयात अथवा इतर ठिकाणी संदर्भ सेवा घ्यावयाची हे पुर्णत: रूग्णाच्या इच्छेवर अवलंबून राहील. त्यावर होणारा खर्च औरंगाबाद महानगरपालिका अदा करणार नाही.
५. एम.जी.एम.येथील तज्ञ वैद्यकीय अधिकारी यांनी शस्त्रक्रिया केलेल्या, तपासणी केलेल्या, उपचार केलेल्या रूग्णाबाबत कायदेशीर बाबीस (मेडीको लिगल लॅबिलीटीज) यास संबंधीत वैद्यकीय अधिकारी (डॉक्टर) जबाबदार राहतील.
६. कुटुंब कल्याण नसबंदी शस्त्रक्रिया, गुंतागुंतीची प्रसूती व इतर आरोग्य विषयक सर्व राष्ट्रीय कार्यक्रम राबविण्यासाठी लागणारी साहित्य, साधन सामुग्री, औषधी पुरवठा मनपास करावा लागेल.
७. रूग्णालयात लागणारा वैद्यकीय व निमवैद्यकीय कर्मचारी वर्ग मनपाचा असेल.
८. सर्व तज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यामार्फत कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया प्रसूतीपुर्व व प्रसूतीपश्चात तपासण्या उपचार मनपाचे वैद्यकीय अधिकारी व आवश्यकतेनुसार एमजीएम चे तज्ञांकडून करून घेण्यात येईल.

९. एमजीएम येथील तज्ञ वैद्यकीय अधिकारी यांची मानद स्वरूपात उपलब्ध झालेली सेवा विघटन करण्याचा अधिकर मनपास राहील.

वरील अटी व शर्तीच्या अधिन राहून एम.जी.एम. रूग्णालय औरंगाबाद येथील तज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांची सेवा सिडको एन-८ रूग्णालय मनपा औरंगाबाद येथे मानद स्वरूपात उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

<u>संवाद :</u>

श्री कवरसिंग बैनाडे : शहरात बऱ्याच जगा लीजवर देणयात आल्या त्या महानगरपालिकेच्या ताब्यात आजही नाहीत. चांगली सेवा मिळावी, आरोग्याचा प्रश्न आहे, सर्वांना सूविधा महानगरपालिकेमार्फत मिळाव्या हे सर्व ठिक आहे हा दवाखाना एखादया ट्रस्टला देण्या ऐवजी तेथे तत्त डॉक्टर ठेऊन महानगरपालिकेनेच हा दवाखाना चालवावा कृपया याचा विचार करावा.

मा.सभापती : सहमत आहे. जेबायलॉजव करारनामा आहे त्यात लीजवर कुठल्याही प्रकारचा दवाखाना दिलेला नाही या दवाखान्यात एमजीएम दवाखान्यातील तत्त डॉक्टर फक्त सेवा देणार आहे इतर संस्था सेवा करण्यास तयार असतील तर त्यांना सूधदा देऊ शकतो मोफत सेवा देणाऱ्या संस्थेला काम करण्यास देण्यास हरकत नसावी नूकताच मा.आयूक्त यांनी राजस्थान दौरा केलेला आहे या माध्यमातून सेवा दिल्यास शासनाकडून ज्या सवलती आहे त्या घेता येतील व विना मूल्य एखादी संस्था सेवा राबवीत असेल व शासन स्तरावरील सुविधा मिळत असेल तर हरकत नसावी.त्या डॉक्टरांना कोणतेही मानधन नाही प्रमूख म्हणून ते सेवा करणार नाही एखादी शस्त्रक्रिया झाल्यानंतर त्यात काही घटना घडल्यास संबधीत डॉक्टर जबाबदार राहतील धोरण म्हणून स्विकारावे म्हणून हा प्रस्ताव ठेवलेलाआहे.

श्री.बारवाल गजनन :शहरात अनेक निष्कृष्ठ दर्जचे दूध येते त्यावर अदयाप कार्यवाही झालेली नाही त्याच बरोबर शहरात मोठया प्रमाणात आंबा आयात होत आहे तो पिकविण्यासाठी रासायनीक द्रव्य प्रक्रीया करून पिकविले जते. त्यामुळे अनेक नागरीकांना त्रास होत आहे पदमपूरा भागा व इतरही स्लम भागात नालीमध्ये अनेक नळाच्या तोटयाआहेत पाणी आल्यानंतर खोल खड्डयातून लोकांना पाणी भरावे लागते व नालीतील दुषीत पाणी पिणयाच्या पाण्यात जते तेथील जनतेच्या आरोग्याच्या दृष्टीने नळाची दूरूस्ती महानगपालिकेमार्फत करण्यात यावी.तसेच काही ठिकाणी ड्रेनेजलाईन सुध्दा फूटलेल्या आहेत.

मा.सभापती : आरोग्य विभागाने दूधाची तपासणी अन्न व भेसळ विभागामार्फत करावी तसेच अनेक भागात पिण्याचे पाणी नागरीकांना खोलवरून काढावे लागते.त्यासाठी नालीमधे जेथे पाईप नादुरूस्त असेल बॉल लिकेजेस असतील ते दुरूस्त करण्यात याव्या स्लम भागात अधिकारी यांनीपाहणी करावी व दुषित पाणी पिण्याचे दिले जणार नाही याचीकाळजे घ्यावी.

सौ.लता दलाल : आताच स.सदस्य श्री बारवाल यांनी दूध व आंबा संदर्भात सूचना केली आंबा हा रासायनीक द्रव्य टाकून पिकविला जतो जे जनतेच्या जिवीतास घातक ठरू शकतो शहरात अशा बाबतीत तपासणी करणयासाठी अन्न निरीक्षक

महानगरपालिकेकडे नाही काही जगा रिक्त आहेत त्या तात्काळ भरण्याची कार्यवाही करावी.

मा.सभापती :प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिडको एन-८ रूग्णालय मनपा औरंगाबाद येथील आरोग्य सेवेचे बळकटीकरण करून आरोग्य विषयक कामाचा संख्यात्मक व गुणात्मक दर्ज सुधारण्याकरीता सदरील रूग्णालयात होणाऱ्या गुंतागुंतीची प्रसूती, स्त्री व पुरूष नसबंदी शस्त्रक्रिया, नेत्ररोग व अंधत्व निवारण, कुटुंब कल्याण माता बाल संगोपन व इतर सर्व राष्ट्रीय कार्यक्रम राबवण्याकरीता महात्मा गांधी मिशन (एम.जी.एम.वैद्यकीय महाविद्यालय) येथील तज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांची सेवा मानद स्वरूपात सिडको एन-८ रूग्णालय येथे प्रस्तावातील अटी व शर्तीच्या अधिन राहून एम.जी.एम.रूग्णालयास उपलब्ध करून देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, चिकलठाणा येथील २० खाटी रूग्णालय विकसीत करणे या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रूपये ३१,३२,०००/- चे असून सदर अंदाजपत्रकास दि.४/१/२००५ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेमध्ये विषय क्रमांक ५१६/४ नुसार मान्यता प्राप्त झालेली आहे.

उपरोक्त मान्यतेनुसार सदर कामाच्या निविदा मागविल्या असता विक्रीच्या अंतिम तारखे पर्यंत एकूण २४ निविदा विक्री झाल्या व स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण ८ निविदा दर भरून प्राप्त झाल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| १. मे.एल.के.कन्स्ट्रक्शन | १५.७५% कमी दराने |
| २. मे.अलीफ असोसिएट | १५.३१% कमी दराने |
| ३. मे.अनुयोग कन्स्ट्रक्शन | १५.१९% कमी दराने |
| ४. मे. हायवे कन्स्ट्रक्शन | १४.९९९% कमी दराने |
| ५. मे. शहा कन्स्ट्रक्शन | १४% कमी दराने |
| ६. मे.मेट्रो असोसिएट | १३.२०% कमी दराने |
| ७. मे. अमन असोसिएट | ९.७८६% कमी दराने |
| ८. मे. जयलक्ष्मी कन्स्ट्रक्शन | ७% कमी दराने |

प्राप्त निविदांपैकी सर्वात कमी दराची म्हणजेच अं.प.दरापेक्षा १५.७५% कमी दराची निविदा मे.एल.के. कन्स्ट्रक्शन यांची असून त्यास मा.आयुक्तांनी या आर्थिक वर्षात जस्तीत जस्त १० लक्ष पर्यंत मर्यादीत खर्चाचे काम हाती घेण्यात येऊन उर्वरीत कामासाठी ठेकेदाराकडून याच दराने काम पूर्ण करतील अशी लेखी संमती घेण्यात यावी या अटीवर दिनांक २०.६.२००५ रोजी मान्यता दिली आहे.

करीता मे.एल.के.कन्स्ट्रक्शन यांची १५.७५% कमी दराची निविदा मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

मा.सभापती : प्रस्तावास सर्वानूमते मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे चिकलठाणा येथील २० खाटी रूग्णालय विकसीत करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.७५% कमी दराची मे.एल.के.कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिकेतर्फे महानगरपालिकेच्या पदाधिकाऱ्यांना कार्यालयीन कामासाठी चार चाकी वाहने देण्यात आलेली आहेत. सध्या या वाहनांमुळे महानगरपालिकेला खालीलप्रमाणे खर्च करावा लागतो.

| **पदाधिकारी** | **प्रतिमहा खर्च रूपये** |
|---|---|
| मा. महापौर | ३४,६००/- |
| मा.उपमहापौर, मा.सभापती-स्थायी समिती,<br>मा.सभागृह नेता, मा.विरोधी पक्षनेता | २६,६००/- |

मा.महापौर यांच्या दालनात सन्माननीय पदाधिकारी व अधिकारी यांच्या संयुक्त बैठकीत स.पदाधिकाऱ्यांनी सुचना केलेल्या आहेत की, ज्या पदाधिकाऱ्यांना स्वत:ची खाजगी वाहने आहेत व जे पदाधिकारी अशी खाजगी वाहने स्वत: वापरतील अशा पदाधिकाऱ्यांना या वाहनाप्रित्यर्थ, महानगरपालिकेतर्फे सद्य परिस्थितीतील पदाधिकाऱ्यांच्या वाहनांवर करण्यात येणाऱ्या खर्चा समकक्ष खर्च पदाधिकाऱ्यांना देण्यात यावा. स.पदाधिकाऱ्यांच्या सुचनेनुसार जर पदाधिकाऱ्यांना स्वत:ची खाजगी वाहने वापरण्याची परवानगी दिली तर महानगरपालिकेचा आर्थिकदृष्ट्या दोन प्रकारे फायदा होईल. सद्य:स्थितीत महानगरपालिकेकडे वाहन चालकांची कमतरता असुन सदरील वाहन चालक इतर वाहनांवर वापरता येतील व दैनिक वेतनावर नवीन वाहन चालक नेमण्याची आवश्यकता भासणार नाही. तसेच महानगरपालिकेच्या वाहनांची झीज होणार नाही. विविध प्रसंगी महानगरपालिकेस मा.सचिव, मा.निवडणूक आयुक्त किंवा इतर उच्च पदस्थ अधिकारी शहरात आल्यास त्यांना भाड्याने वाहने घ्यावी लागतात, त्याऐवजी पदाधिकाऱ्यांची वाहने राखीव ठेवता येतील.

तरी मा.महापौर यांनी त्यांचे खाजगी वाहन वापरल्यास दरमहा रूपये २९,६००/- एवढा खर्च व मा. उपमहापौर, मा.सभापती-स्थायी समिती, मा.सभागृह नेता, मा.विरोधी पक्ष नेता यांनी स्वत:चे खाजगी वाहन वापरल्यास दरमहा रू.२१,६००/- एवढ्या वाहन खर्चावर मर्यादा निश्चित करण्याकरीता प्रस्ताव स्थायी समीसमोर विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.गजनन बारवाल : पदाधिकारी यांचे विशेष दौरा निघेल त्यावेळी वेगळा खर्च दयावा लागेल.

मा.सभापती : आपण महापौरपद भुषविलेले आहे आपणास सर्व माहित आहे. विशेष दौरा संदर्भात या प्रस्तावात प्रश्नच येत नाही. प्रस्तावास मान्यता देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ज्या पदाधिकाऱ्यांना स्वत:ची खाजगी वाहने आहेत व जे पदाधिकारी अशी खाजगी वाहने स्वत: वापरतील अशा पदाधिकाऱ्यांना या वाहनाप्रित्यर्थ, महानगरपालिकेतर्फे पदाधिकाऱ्यांच्या वाहनांवर करण्यात येणाऱ्या खर्चा समकक्ष म्हणजेच मा. महापौर यांनी त्यांचे खाजगी वाहन वापरल्यास दरमहा रूपये २९,६००/- एवढा खर्च व मा. उपमहापौर, मा.सभापती-स्थायी समिती, मा.सभागृह नेता, मा.विरोधी पक्ष नेता यांनी स्वत:चे खाजगी

वाहन वापरल्यास दरमहा रू.२१,६००/- एवढ्या वाहन खर्चाची मर्यादा निश्चित करण्यास व त्यानुसार खर्च अदा करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३ :**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या विविध लेखाशिर्षांतर्गत ठेवी महानगरपालिकेच्या परिसरातील युनायटेड वेस्टर्न बँकेत असून खालील ठेवींची मुदत त्यांच्या समोर दर्शविलेल्या तारखेस पूर्ण होत असून त्याचे नुतनीकरण पुढील ३ वर्षाच्या कालावधीसाठी करण्यासाठी बँकेस मुळ पावत्या सादर केलेल्या आहेत. नुतनीकरण केलेल्या आहेत. नुतनीकरण केलेल्या पावत्यांचे क्रमांक खालील प्रमाणे :

| अ क्र. | ठेव लेखाशिर्ष | ठेव क्रमांक | रक्कम रूपये | ठेव संपल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | वेतन राखीव निधी | ७०५४६९ | १,४८,०००/- | २८.५.२००५ |
| २ | भविष्य निर्वाह निधी (कार्यालय) | ७०५४६८ | ७०,००,०००/- | २८.५.२००५ |
| ३ | भविष्य निर्वाह निधी (शिक्षण) | ७०५४६७ | १०,००,०००/- | २८.५.२००५ |
| ४ | कर्जनिवारण निधी | ५४०७७३ | ३,८०,२८८/- | २०.५.२००५ |
| ५ | कर्जनिवारण निधी | ५४०७७४ | २,१८,६१७/- | २९.५.२००५ |
| ६ | भविष्य निर्वाह निधी (शिक्षण) | ७०५५६४ | ८,००,०००/- | १४.६.२००५ |
| ७ | महानगरपालिका निधी | ११४६१९० | १६,९१५/- | २१.५.२००५ |

अ.क्र.१ ते ६ पावत्यांचे नुतनीकरण व अ.क्र.७ च्या पावतीचे रोखीकरण करून व्याजसह रक्कम महानगरपालिकेचे चालु खाते क्र.५०१ मध्ये जमा करण्यात आलेले असून मा.स्थायी समिती समोर कार्योत्तर मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

श्री.कवरसिंग बैनाडे : ज्या काही ठेवी ठेवणार आहेत महानगरपालिकेस प्रतिवर्ष यावर किती व्याज मिळते याची माहिती देण्यात यावी.यापेक्षा नॅशनलाईज बँक १टक्का २ टक्का जस्त व्याजदेत असेल तर तेथे या ठेवी का ठेवण्यात येऊ नये.

श्री.बारवाल गजनन : ज्या बँकेत या ठेवी ठेवणार आहोत त्या बँकेकडून आणखी काय सूविधा मिळणार आहे किवा घेतो.

मुख्यलेखाधिकारी : यूनायटेड वेस्टर्न बँकेत या ठेवी ठेवण्यात आलेल्या आहेत ५ वर्षापूर्वी या बँकेचे दर ११ टक्के होते त्यावेळेस ही गूंतवणूक करण्यात आलेली होती आता जेदर आहेत ते ७ टक्के शेडयूल बँकेचे आहेत. नॅशनल बँकेचे ५.२५ टक्के आहे या बँकेत ज्याकाही ठेवी ठेवतो त्यावर शेडयूल बँकेपेक्षा १ टक्का व्याजजस्त ही बँक देते शेडयूल बँकेचे दर ७ टक्के आहे हीबँक या ठेवीवर ८ टक्के व्याजदेते नॅशनलाईज्ड बँकेचे दर ५.२५ टक्के आहे त्यामूळे युनायटेड वेस्टर्न बँकेत ठेवी ठेवण्याची शिफारस केलेली आहे.

श्री.कवरसिंग बैनाडे :महानगरपालिकेच्या पैशाचा दुरूपयोग होवू नये ५.२५टक्के पेक्षा जस्त एखादी बँक व्याज देत असेल तर त्यासाठी वृत्तपत्रात तसे जहीरात का देत नाही नॅशनलाईज्ड बॅकेचे दर मागवावे त्यानुसार कार्यवाही व्हावी.

मुख्यलेखाधिकारी :नॅशनलाईज्ड बॅंकेचे व्याजचे दर मागविण्यात आलेले आहेत. त्या संबधीचे पत्र माझ्याकडे आहे.

मा.सभापती : स.सदस्यांनी सूचना केल्याप्रमाणे पून्हा नॅशनलाईज बॅंकेचे व्याजचे दर मागवून घ्यावे एखादी बॅंक चांगली सूविधा देत असेल व्याजदर वाढवून मिळत असेल तर तसा विचार करावा कर्जमिळते का ? याचाही विचार करावा.

मुख्यलेखाधिकारी :कर्ज घेण्यासंबधीचे प्रपोजल देण्यात आलेले आहे ३२.५० काटी रू कर्जची मागणी केली आहे ती कार्यवाही अंतिम टप्प्यात आले.

मा.सभापती :प्रस्तावास मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेच्या विविध लेखाशिर्षांतर्गत ठेवी महानगरपालिकेच्या परिसरातील युनायटेड वेस्टर्न बॅंकेतील ठेवींचे पुढील ३ वर्षाच्या कालावधीसाठी प्रस्तावातील अ.क्र.१ ते ६ च्या पावत्यांचे नुतनीकरण करण्यास व अ.क्र.७ च्या पावतीचे रोखीकरण करून व्याजसह रक्कम महानगरपालिकेचे चालु खाते क्र.५०१ मध्ये जमा करण्यास कार्योत्तर मंजूरी देण्यात येते.

## ऐनवेळचे विषय

**विषय क्र.१४ :**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेने प्रशासनामार्फत १ एप्रिल २००० पासून प्रति माह रू.५.०० लक्ष नुसार सि.टी.डी. खात्यामध्ये गुंतवणूक करण्यात आलेली असून त्याची मुदत दि.०३.०७.२००५ रोजी संपत आहे. सि.टी.डी. खात्यामधील गुंतवणूक रक्कमेपासून महानगरपालिकेस रू.४,३८,७२,२००/- इतकी रक्कम प्राप्त होणार आहे. महानगरपालिकेने रू.३,१५,००,०००/- इतकी रक्कम प्रति माह रू.५.०० लक्ष नुसार ६३ महिन्यात गुंतविले होते, यावर रू.१,२३,७२,२००/- इतके व्याजप्राप्त झालेले आहे.

सद्य परिस्थितीत प्रशासनास अंदाजित रू.२.०० कोटीचे स्पिल ओव्हर मधील कामांची देयके मक्तेदारास अदा करावयाची आहेत. त्या अनुषंगाने उपरोक्त प्राप्त रक्कमेतुन रू.२.०० कोटी महानगरपालिकेचे दि युनायटेड वेस्टर्न बॅंक, महानगरपालिका शाखा येथील चालु खाते क्र.५०१ मध्ये वळती करून रू.२,३८,७२,२००/- इतकी रक्कम तीन महिन्याकरिता अल्प मुदत ठेव मध्ये गुंतवणूक करणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

मा.सभापती : ऐनवेळच्या या प्रस्तावास मान्यता देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सि.टी.डी. खात्यामधील गुंतवणूक रक्कमेपासून महानगरपालिकेस प्राप्त होणाऱ्या रक्कम रू.४,३८,७२,२००/- या रक्कमेमधून मक्तेदारास स्पिल ओव्हर मधील कमांची देयके अदा करण्यास्तव रू.२.०० कोटी महानगरपालिकेचे दि युनायटेड वेस्टर्न बॅंक, महानगरपालिका शाखा येथील चालु खाते क्र.५०१ मध्ये वळती करण्यास तसेच रू.२,३८,७२,२००/- इतकी रक्कम तीन महिन्यायकरिता अल्प मुदत ठेव मध्ये गुंतवणूक करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद :**

| | |
|---|---|
| मा.सभापती | : झोन अधिकारी यांनी वसूली संदर्भात माहिती दयावी. झोन क्र १ च्या वसूली बाबत झोन अधिकारी यांनीमाहिती दयावी. |
| विभागीय अधिकारी | : १ एप्रिल पासून ते २८जून २००५ पर्यत मालमत्ता कर ११.९८ लक्ष रू. इतकी वसूली झालेली आहे |
| मा.सभापती | :गेल्या ८ दिवसात किती वसूलीत वाढ झाली एवढाच खुलासा करावा. |
| विभागीय अधिकारी | :मालमत्ता कर रू७३,५०० /-इतकी वसूली झालेली असून पाणीपट्टी रू.६७,१००/- इतकी वसूली गेल्या आठ दिवसात झालेली आहे. |
| मा.सभापती | : जेउद्दिष्ट ठरवून दिले आहे ते पूर्ण करण्यासाठी दररोजकिती वसूली होणे आवशक आहे याबाबत काय नियोजन केलेले आहे. |
| विभागीय अधिकारी | :मागिल बाकी वसूल करण्याचे आपले आदेश आहेत मागील वर्षाच्या ३३७ संचिका तयार केल्या होत्या वसूल झालेली रक्कम वज करून कर निरीक्षक यांना ३३७ संचिका या वसूली साठी देण्यात आलेल्या आहे त्यानूसार कर निरीक्षक वसूली करीत आहे. |
| मा.सभापती | :सर्व विभागीय अधिकारी यांना सूचना आहे की वसूली किती केली हा महत्वाचा मुद्दा आहे एकूण ९३ कोटीची कराची थकबाकी आहे त्यापैकी मागील ८ दिवसात किती वसूल केले हा महत्वाचा मूद्दा आहे वसूली करण्यास कोणी अडसर येणार नाही आलेच तर तसा अहवाल दयावा मी विनंती करेल प्रशासनाच्या कामात कोणीही हस्तक्षेप करणार नाही. |
| श्री.रेणूकादास वैद्य | :ज्या भागात वसूली जस्त होईल त्या भागासाठी विकास कामावर जस्त खर्च करण्यात यावा मागील बैठकीतही मी ही सूचना केलेली होती. |
| श्री.गजनन बारवाल | : अधिकारी वसूली करीत नसेल तर वसूली करण्याचा ठेका देउन टाकावा. |
| विभागीय अधिकारी | :कर निरीक्षक यांना उद्दिषट दिलेले आहे. |
| मा.आयुक्त | : गेल्या दोन महीन्यात थकबाकी किती टक्के वसूल झाली तेव्हढाच खुलासा करावा. |
| विभागीय अधिकारी | :रूपये २.७५ कोटीतून रूपये १.४० कोटी वसूल केलेले आहे. |
| मा.आयुक्त | : प्रत्येक आठवडयात रू.७०,०००/- वसूल केले असे म्हटले तर दोन महिण्यात रू.१.४० कोटी कसे वसूल करणार. पुढच्या वेळेस अशी उत्तरे देणे चूकीचे होईल. |
| मा.सभापती | : जकत दररोजकिती वसूल होते त्याचा अहवाल दररोजयेतो त्याच प्रमाणे पाणी पट्टी व मालमत्ता कर हा दर आठवडयात किती वसूल होतो याची माहिती यापुढे सभापती तसेच मा.महापौर यांना देण्यात यावी. |
| श्री.गजनन बारवाल | : उपआयूक्त (म) यांनी याकडे विशेष लक्ष दयावे झोन मध्ये बैठका घ्याव्यात जी वसूली झाली ती बरोबर नाही योग्य वाटत नाही. |
| मा.सभापती | : प्रशासनाने वसूलीसाठी विशेष असे लक्ष दयावे वसूलीचे उद्दिष्ट पूर्ण करावे. |

राष्ट्रगितानंतर सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद